महाराष्ट्र विधानपरिषद

दुसरे अधिवेशन, २०१५

तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

शुक्रवार, दिनांक ३१ जुलै, २०१५ / श्रावण ९, १९३७ (शके)

(१) शालेय शिक्षण, क्रीडा आणि युवक कल्याण, उच्च व तंत्रशिक्षण, वैद्यकीय शिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य मंत्री
(२) अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण, अन्न आणि औषध प्रशासन, संसदीय कार्य मंत्री
(३) पर्यावरण मंत्री
(४) पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री

} **यांचे प्रभारी विभाग**

प्रश्नांची एकूण संख्या - ७८

रात्रशाळांना पूर्णवेळ शाळेचा दर्जा देण्याबाबत

(१) * ७३०३ श्री.नागो गाणार, श्री.अनिल सोले, श्री.रामनाथ मोते, श्री.मितेश भांगडिया : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील रात्रकालीन शाळांना व कनिष्ठ महाविद्यालयांना पूर्णवेळ शाळेचा दर्जा देण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १५ मार्च, २००७ मध्ये गठीत केलेल्या समितीच्या अहवालामध्ये रात्रशाळेंना पूर्णवेळ शाळेचा दर्जा देण्याबाबत शिफारस करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने राज्यातील फक्त कोल्हापूर येथील आर्ट कॉमर्स नाईट महाविद्यालयाला पूर्णवेळ दर्जा दिला असून उर्वरित शाळांबाबत अद्याप निर्णय घेतला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी मा.शिक्षण मंत्र्यांनी बैठक घेण्याचे आश्वासन दिले होते, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(६) नसल्यास, सदर निर्णय केव्हापर्यंत होणे अपेक्षित आहे ?

श्री. विनोद तावडे : (१) होय हे खरे आहे.

(२) नाही.

(३) होय हे खरे आहे.

(४), (५) व (६) याबाबत लवकरच बैठक घेण्यात येईल.

राज्यातील विद्यापीठात अधिसभा ही संस्था बंद करण्याचा शासनाने घेतलेला निर्णय

(२) * ७५८६ डॉ.सुधीर तांबे, श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विद्यापीठात महत्वाची भूमिका बजविणारी अधिसभा ही संस्था बंद करण्याचे शासनाचे धोरण असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे विद्यापीठाच्या सर्वसमावेशक धोरणावर व विद्यापीठाच्या शैक्षणिक गुणवत्तेवर विपरीत परिणाम होईल, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली आहे,

(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) नाही.

(२), (३) आणि (४) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर येथील अंबाझरी तलावातील पाणी प्रदुषित झाल्याबाबत

(३) * ८२८० श्री.प्रकाश गजभिये : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील अंबाझरी तलावातील पाणी प्रदुषित झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तलावात एमआयडीसी, वाडी व अन्य परिसरातील व नाल्याच्या स्त्रोतातून प्रदूषित पाणी जमा होते, हे ही खरे आहे काय,

(३) याबाबत काही पाहणी अहवाल शासनाकडे आहे काय,

(४) दूषित पाण्यामुळे नागरीकांचे जीवन धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, प्रदूषित अंबाझरी तलाव स्वच्छ करण्यास शासनाने कोणती ठोस उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

श्री. रामदास कदम : (१) होय.

(२) अंशत: खरे असून अंबाझरी तलावात वाडी नगरपरिषद क्षेत्रातील घरगुती सांडपाणी मिसळत आहे.

(३) होय.

(४) अशा प्रकारची तक्रार शासनाकडे प्राप्त झालेली नाही.

(५) वाडी नगरपरिषदेच्या क्षेत्रातील घरगुती सांडपाण्यामुळे होणाऱ्या अंबाझरी तलावाच्या प्रदूषणाच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने वाडी नगरपरिषदेस प्रदूषण कायद्याच्या कलम ३३ (अ) नुसार प्रस्तावित निर्देश दिले आहेत, तसेच अंबाझरी तलावामध्ये होणारे प्रदूषण रोखण्यासाठी सदर तलावाचा राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजनेमध्ये समाविष्ट करण्याबाबतचा आयुक्त, महानगरपालिका नागपूर यांचेकडून शासनास प्राप्त प्रस्ताव दि. ८/१०/२०१२ रोजी केंद्र शासनास पाठविण्यात आला असून सद्यस्थितीत प्रस्ताव केंद्र शासनाकडे प्रलंबित आहे.

एम.बी.ए. प्रथम वर्षाच्या परिक्षेमध्ये अन्य विषयाचा प्रश्न देण्यात आल्यामुळे निर्माण झालेला गोधळ

(४) * ८११४ डॉ.अपूर्व हिरे : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एम.बी.ए. प्रथम वर्षाच्या व्दितीय सत्राच्या परिक्षेत ऑपरेशन सप्लायचेन मॅनेजमेंटच्या पेपरामध्ये "डिसीजन सायन्स" या विषयाचा प्रश्न देण्यात आल्याचे निदर्शनास येताच पेपर संपण्याच्या अवघ्या २० मिनीटे अगोदर तो बदलून देण्यात आल्याने मोठा गोंधळ निर्माण झाल्याचे दिनांक ६ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रश्न प्रत्रिकेतील प्रश्न ६ मधील हा दुसरा प्रश्न बदलण्यापुर्वी काही विद्यार्थ्यांनी तो सोडवला होता, पण ऐनवेळी हा प्रश्न बदलल्याने विद्यार्थ्यांच्या वेळ वाया गेला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पेपर सेट करताना झालेल्या या चुकीमुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होवू नये, म्हणून शासन याबाबत कोणता धोरणात्मक निर्णय घेणार वा घेण्यात येणार आहे ?

श्री. विनोद तावडे : (१) अंशत: खरे आहे.

(२) नाही.

(३) प्राश्निकाकडून झालेल्या चुकीबाबत खुलासा घेऊन विद्यापीठाकडून योग्य ती कारवाई करण्यात येईल.

एमसीव्हीसीच्या शिक्षक निर्देशकांची विनाअनुदान काळातील सेवा ग्राहय धरण्याबाबत

(५) * ७५१४ श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.किरण पावसकर, श्री.सतिश चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, डॉ.सुधीर तांबे, श्री.दत्तात्रय सावंत : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शालेय शिक्षण विभागाप्रमाणे तंत्रशिक्षण विभागातील एमसीव्हीसीच्या शिक्षक निर्देशकांची विनाअनुदान काळातील सेवा ग्राहय धरण्याबाबत शासनाचा विचार पूर्ण झाला आहे काय,

(२) असल्यास, शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(३) उपरोक्त विषयी अद्याप कार्यवाही केली नसल्यास, होणाऱ्या विलंबाची सविस्तर कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) व (२) सदर बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

खाजगी अनुदानित मराठी शाळांसाठी करावयाची उपाययोजना

(६) * ७३६६ श्री.विजय गिरकर : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील घाटकोपर येथील एकेकाळी २६ तुकड्या असलेल्या सर्वोदय शाळेत आता केवळ २५ विद्यार्थी असल्याचे धक्कादायक वास्तव निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील गरीब विद्यार्थ्यांसाठी असलेल्या खाजगी अनुदानित शिक्षणाचा एक मोठा स्त्रोत आता कायमचा बंद होण्याच्या मार्गावर असल्याचे समजते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, विद्यार्थीच नसल्याने शिक्षकांची संख्याही तब्बल १३० वरुन २ वर आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अशा बिकट परिस्थितीत असलेल्या खाजगी अनुदानित मराठी शाळांसाठी शासनाने कोणती ठोस उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

श्री. विनोद तावडे : (१), (२) व (३) सदर शाळेत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थी संख्येनुसार १ मुख्याध्यापक व २ शिक्षकांची पदे मंजूर आहेत.
(४) पालकांचा कल पाल्यांना इंग्रजी माध्यमाच्या शाळेमध्ये घालण्याकडे आहे. इंग्रजी माध्यमाच्या बहुतांश शाळा या विनाअनुदानित आहेत. यामुळे विनाअनुदानित शाळांमध्ये विद्यार्थी प्रवेशाचे प्रमाण वाढत आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळा व खाजगी अनुदानित शाळांमध्ये सेमी इंग्रजी वर्ग सुरु करण्यास मान्यता देण्यात येत आहे. शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा व खाजगी अनुदानित शाळांतील विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके, शालेय पोषण आहार इ. योजनांचा लाभ देण्यात येत आहे. तसेच राज्यात गुणवत्तावाढीसाठी प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र व सरल (Systematic Administrative Reforms for Achieving Learning by student- SARAL) इ. उपक्रम राबविण्यात येत आहेत.

यवतमाळ येथील जिल्हा रुग्णालयात रुग्णांची तपासणी करणेबाबत

(७) * ७८५२ श्री.संदिप बाजोरिया, श्री.नरेंद्र पाटील, श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग, श्रीमती विद्या चव्हाण : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवतमाळ येथील जिल्हा रुग्णालयासाठी कोटयावधी रुपये खर्च करुन महागडी उपकरणे खरेदी केली असता गरीब व सर्व सामान्य रुग्णांना खाजगी रुग्णालयातून पैसे खर्च करुन तपासणी करुन घ्यावी लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार रुग्णांना करावी लागणारी तपासणी रुग्णालयातच व्हावी म्हणून शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

सर्वशिक्षा अभियान योजनेअंतर्गत कंत्राटी तत्वावर मागील ९ वर्षापासून काम करणाऱ्या साधन व्यक्तींना नियमित सेवेत सामावून घेण्याबाबत

(८) * ८०७२ श्री.रामनाथ मोते, श्री.नागो गाणार, डॉ.अपूर्व हिरे : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सर्वशिक्षा अभियान योजनेअंतर्गत कंत्राटी तत्वावर सध्या कार्यरत असणाऱ्या साधन व्यक्तींची संख्या किती आहे,

(२) मागील ९ वर्षापासून कंत्राटी तत्वावर काम करणाऱ्या साधन व्यक्तींना नियमित सेवेत सामावून घेण्याबाबत लोकप्रतिनिधी व संबंधित कर्मचाऱ्यांकडून सातत्याने मागणी होत आहे, हे खरे आहे काय,

(३) महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई या संस्थेच्या प्रकल्प संचालकांनी कंत्राटी कर्मचाऱ्यांना नियमित सेवेत सामावून घेणेबाबत दिनांक ५ मार्च, २००९ रोजी शासनास सादर केलेल्या अहवालाचे व शिफारसींचे स्वरुप काय आहे,

(४) प्रकल्प संचालकांच्या अहवालाच्या अनुषंगाने शासनाने काय कार्यवाही केली आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) सर्वशिक्षा अभियान योजनेअंतर्गत कंत्राटी तत्तावर सध्या १९७८ साधनव्यक्ती कार्यरत आहेत.

(२) होय, हे खरे आहे.

(३) प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई यांनी दिनांक ५ मार्च, २००९ रोजी सर्व शिक्षा अभियान कार्यक्रमांतर्गत नियुक्त केलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना शासन सेवेत/जिल्हा परिषद सेवेत सामावून घेणेबाबत प्रस्ताव सादर केला होता.

(४) यापूर्वी महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेकडून प्राप्त झालेला प्रस्तावाच्या अनुषंगाने सर्व शिक्षा अभियानांतर्गत कर्मचाऱ्यांना जिल्हा परिषद सेवेत सामावून घेता येणार नाही असा निर्णय घेण्यात आला होता. तसेच त्यांना शासन सेवेतसुध्दा सामावून घेता येणार नाही असे त्यांना दिनांक १७.०३.२००६ आणि दि. ०७.०१.२००८ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. सबब, या प्रस्तावावर पुन्हा विचार करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

चंद्रपूर जिल्हा देशात भूजल प्रदूषणास प्रथम क्रमांकावर असल्याबाबत

(९) * ७४२० श्रीमती शोभाताई फडणवीस : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर भूजल सर्व्हेक्षण आणि विकास यंत्रणा विभागाने सन २०१४-१५ या वर्षात ८४७ ग्रामपंयचायती मधील ११,२८० ठिकाणातील भूजलचे नमूने तपासले असता त्यापैकी ५८९३ नमुन्यात नायट्रेड, फ्लोराइड, क्लोराइड, लोह, पी.एच.अल्काली, टर्बिनिटी व हार्डनेसने प्रदूषण आढळून आले असून चंद्रपूर जिल्हा देशात भूजल प्रदूषणास प्रथम क्रमांकावर असल्याचे दिनांक २० मे, २०१५ रोजी निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, भूजल प्रदूषण कमी करण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर : (१) केंद्रिय भुमिजल मंडळाच्या संकेत स्थळावर उपलब्ध असलेल्या अहवालात देशातील १९ राज्यांतील १६८ जिल्ह्यामधील भुजल फ्लोराईडने बाधित असल्याचे नमुद केले आहे. त्यामध्ये महाराष्ट्रातील ८ जिल्ह्यांचा समावेश असून त्यापैकी चंद्रपूर हा एक जिल्हा आहे.

चंद्रपुर जिल्ह्यात भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमार्फत सन २०१४-२०१५ या वर्षात ८४७ ग्रामपंचायतीमध्ये ११,२८० पाणी नमुने तपासण्यात आले, त्यापैकी मुख्यतः ८८ (०.७८%) पाणी नमुने क्लोराईड, २१३ (१.८९%) पाणी नमुने हे टर्बिडीटी, २३८ (२.१०%) पाणी नमुने आयर्न (लोह), ४१९ (३.७१%) पाणी नमुने हे अल्कली, ६८४ (६.०६%) पाणी नमुने हे पी.एच.९५२ (८.४४%) पाणी नमुने हे फ्लोराईड, १५९३ (१४.१२%) पाणी नमुने हे हार्डनेस व ३७५५ (३३.२८%) पाणी नमुने हे नायट्रेटने बाधित आढळून आले आहे.

(२), (३) व (४) यास्तव चंद्रपूर जिल्ह्याच्या भूस्तरीय रचनेचा अभ्यास केला असता असे दिसून येते की, फ्लोराईड, लोह प्रामुख्याने तेथील असलेल्या गोंडवाना, रुपांतरीत इत्यादी खडकांच्या विघटनातून भूजलात मिसळते. या जिल्ह्यातील भूस्तर हा गोंडवाना व रुपांतरीत प्रकारच्या दगडांचा असून, यामध्ये फ्लोराईड लोह असणे ही नैसर्गिक बाब आहे. स्वीकारार्ह मर्यादेपक्षा जास्त असलेल्या भागात शुद्ध पाणी भुपृष्टीय स्त्रोतातून अथवा शुद्ध पाण्याच्या इतर स्त्रोतातून पुरविण्यात येते. याशिवाय जलस्वराज्य-२ कार्यक्रमांतर्गत गुणवत्ता बाधीत गावांमध्ये (पथदर्शी स्वरुपात) शुद्ध पाणी पुरवठ्यासाठी विविध उपाययोजना घेण्यास शासनाने एप्रिल २०१४ पासून प्रकल्पास सुरूवात केलेली आहे.

अमरावती येथील संत गाडगेबाबा विद्यापीठामध्ये बीएड अभ्यासक्रमाऐवजी इतर अभ्यासक्रमाची प्रश्नपत्रिका देण्यात आल्याबाबत

(१०) * ७७३४ श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.रामराव वडकुते, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.ख्वाजा बेग, ॲड.जयदेव गायकवाड, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अब्दुल्ला खान दुर्राणी, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.आनंद ठाकूर, श्री.गुरुमुख जगवानी, श्रीमती स्मिता वाघ, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती येथील संत गाडगेबाबा विद्यापीठामध्ये बीएड अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना बीएड अभ्यासक्रमाऐवजी दुसऱ्याच विषयाची प्रश्नपत्रिका पुरविली गेल्याने ऐनवेळी पेपर रद्द करावा लागल्याची घटना माहे एप्रिल, २०१५ च्या तिसऱ्या आठवडयात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे व त्यानुसार जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, चौकशी व कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) होय.

(२) व (३) बी.एड उन्हाळी २०१५ परीक्षेतील Teacher in Emerging Indian Society ही प्रश्नपत्रिका तारीख २०/०४/२०१५ ला नियोजीत होती. या प्रश्नपत्रिकेच्या पॉकीटात पुढील तारीख २३/०४/२०१५ होणारा विषय Education Psychology ही मुद्रीत झालेली प्रश्नपत्रिका परीक्षा केंद्रावर आढळून आली. त्यामुळे संपुर्ण ३१ परीक्षा केंद्रावरील परीक्षा होवू शकली नाही आणि ती परीक्षा पुढे ढकलण्यात आली. या विषयाची परीक्षा दिनांक ०९/०५/२०१५ ला घेण्यात आली.

चुकीचे निघालेल्या प्रश्नपत्रिकेबाबत सखोल चौकशीकरीता सदर प्रकरण विद्यापीठ कायदा कलम ३२(६)(a) गैरमार्ग शोध समितीसमोर सादर करण्यात येत आहे.

बीड जिल्ह्यातील क्रीडा संकुलाची कामे प्रलंबित असल्याबाबत

(११) * ७५०० श्री.अमरसिंह पंडित, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.धनंजय मुंडे, श्री.विक्रम काळे, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : तारांकित प्रश्न क्रमांक ३६५४ ला दिनांक १२ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यातील ११ तालुक्यांपैकी ८ तालुक्यांत क्रीडा संकुलांच्या कामांना मंजुरी प्राप्त असून मंजुर कामे अनेक वर्षापासून प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने ८ क्रीडा संकुलाकरीता रु. २.८५ कोटीचा निधी वितरीत केला त्यापैकी केवळ रु.४३ लक्षचा निधी खर्च झाला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनेक वर्षांपासून हा निधी अखर्चित राहण्याची कारणे कोणती तसेच या योजनेला इतर लेखाशिर्षामधून निधी खर्च झाला असेल तर तो कोणकोणत्या कामांवर खर्च करण्यात आला,

(४) जिल्ह्यातील क्रीडा संकुलाची कामे वर्षानुवर्षे प्रलंबित असण्याची कारणे कोणती, प्रलंबित कामे पूर्ण करण्यासाठी शासन कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) उर्वरित ३ तालुक्यांच्या क्रीडा संकुलांना किती कालावधीत मंजूरी मिळणे अपेक्षित आहे ?

श्री. विनोद तावडे : (१) होय. अंशत: खरे आहे.

(२) होय.

(३) व (४) बीड जिल्ह्यातील ८ तालुका क्रीडा संकुलांना मंजुरी देण्यात आली आहे. तथापि ५ तालुका क्रीडा संकुलाची कामे प्रगतीपथावर असून ३ क्रीडा संकुलांची कामे जागा उपलब्धतेबाबतच्या प्रशासकीय व तांत्रिक अडचणींमुळे बंद आहेत. आमदार स्थानिक विकास निधीतून त्याचप्रमाणे जिल्हा नियोजन समितीद्वारे पुनर्विनियोजनाद्वारे सदर क्रीडा संकुल कामासाठी इतर लेखाशिर्षातून निधी प्राप्त झाला आहे. सदर प्राप्त झालेला निधी प्रामुख्याने तालुका क्रीडा संकुलाची जागा समपातळीकरण करण्याच्या कामावर खर्च करण्यात आला आहे. सदर कामे पूर्ण होताच क्रीडा संकुलासाठी वितरीत करण्यात आलेल्या निधीतून उर्वरित कामे सुरु करण्यात येतील.

(५) आष्टी, परळी व वडवणी या तालुका क्रीडा संकुलाकरिता जागा प्राप्त झाल्यानंतर राज्य क्रीडा विकास बैठकीत मंजूरी घेण्यात येईल.

राज्यात नागपूर व पुणे येथे भारतीय माहिती व तंत्रज्ञान (IIT) संस्था उभारणार असल्याबाबत

(१२) * ८१९० श्रीमती दिप्ती चवधरी, डॉ.सुधीर तांबे, श्री.सतिश चव्हाण, श्री.धनंजय मुंडे, श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात नागपूर व पुणे येथे भारतीय माहिती व तंत्रज्ञान (IIT) संस्था उभारणार असल्याचे शासनाने नुकतेच जाहीर केले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, यापुर्वीच आय.आय.एम. "नायपर" या दोन्ही नामांकीत संस्था नागपूरकडे वळवल्याने राज्याला मिळालेले ट्रिपल आयआयटी अखेर नागपूरला वळवून मराठवाडयावर पुन्हा एकदा अन्याय केला, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात प्रत्येक विभागाचा समतोल राखण्यासाठी ट्रिपल आयआयटी बाबत पुर्नविचार करुन औरंगाबाद येथे स्थापन करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) नाही.

राज्यात नागपूर व पुणे येथे भारतीय माहिती व तंत्रज्ञान संस्था (IIIT) स्थापन करण्याचा निर्णय दिनांक २० मे, २०१५ रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला आहे.

(२) व (३) या प्रकरणी राज्य शासनाने दिनांक १८/१/२०१३ च्या पत्रान्वये नागपूर येथे व दिनांक १२/२/२००८, ३१/३/२००८, १८/१/२०११ व ३०/११/२०११ रोजीच्या पत्रान्वये पुणे येथे भारतीय माहिती व तंत्रज्ञान संस्था (IIIT) स्थापन करण्याबाबत केंद्र शासनाच्या मानव संसाधन विकास मंत्रालयास विनंती केली होती.

केंद्र शासनाच्या मानव संसाधन विकास मंत्रालयाने दिनांक ३०/१/२०१४ च्या पत्रान्वये पुणे येथे व दिनांक १/५/२०१५ च्या पत्रान्वये नागपूर येथे भारतीय माहिती व तंत्रज्ञान संस्था (IIIT) स्थापन करण्यास सहमती दिली आहे. त्यानुसार राज्यात नागपूर व पुणे येथे भारतीय माहिती व तंत्रज्ञान संस्था (IIIT) स्थापन करण्याचा निर्णय दिनांक २० मे, २०१५ रोजीच्या मंत्रीमंडळ बैठकीत घेण्यात आला आहे. तसेच IIM ची स्थापना नागपूर येथे करण्यास केंद्र शासनाने मान्यता दिली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या निवृत्त वेतनाबाबत

(१३) * ७६७२ श्री.कपिल पाटील : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) न्यायालयातील प्रलंबित प्रकरणे आणि शासनाचे उदासिन धोरण यामुळे दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी अनुदानित शाळांमध्ये नेमणुका झालेले तसेच विनाअनुदानित/अशंत अनुदानित /कायम विनाअनुदानित शाळांमध्ये नेमणुका होऊन नंतर अनुदानावर आलेले शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना कायदेशीर निवृत्ती वेतनापासून शासनाने वंचित ठेवले आहे, हे खरे आहे काय,

(२) याबाबत शासनाने न्यायालयावर न विसंबता स्वत:चे धोरण न ठरविण्याचे कारण काय आहे,

(३) याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

श्री. विनोद तावडे : (१) हे खरे नाही.

(२) व (३) कायम विना अनुदानित शाळांमधील कर्मचा-यांना सेवानिवृत्ती वेतन योजना लागू नाही. दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी १००% अनुदानित शाळांमधील नियुक्त कर्मचा-यांना तसेच मानधनावर नियुक्त शिक्षण सेवकांना जूनी सेवानिवृत्ती वेतन योजना लागू करण्याचा धोरणात्मक निर्णय घेण्यात आलेला आहे. दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी विनाअनुदानित/अंशत: अनुदानित शाळांमधील नियुक्त कर्मचा-यांना ज्या दिनांकास सदर शाळा १००% अनुदानास पात्र ठरेल त्या दिनांकाला लागू असलेली सेवनिवृत्ती वेतन योजना लागू करण्याचा धोरणात्मक निर्णय घेण्यात आला आहे. या अनुषंगाने न्यायालयात प्रकरण दाखल आहेत.

रोहा (जि.रायगड) येथे बेकायदा गुटख्याचा कारखाना सुरु असल्याबाबत

(१४) * ७७८२ श्री.नरेंद्र पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.जयवंतराव जाधव, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अनिल तटकरे : सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रोहा (जि.रायगड) येथे बेकायदा गुटख्याचा कारखाना सुरु असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर बेकायदा सुरु असलेला कारखाना बंद करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश बापट : (१) हे खरे नाही.

तथापि, जिल्हा अन्वेषण विभाग, रायगड यांना दिनांक ०७/०४/२०१५ रोजी मे.अलसबा पान शॉप, शिळफाटा, खोपोली, ता. खालापूर जि. रायगड येथे प्रतिबंधित अन्न पदार्थाचा साठा आढळून आला होता. सदर प्रकरण पुढील तपासासाठी स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा, रायगड यांचेकडे वर्ग करण्यात आले आहे.

(२) होय, पोलिसांमार्फत चौकशी करण्यात आली आहे.

(३) स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा, रायगड यांनी केलेल्या चौकशीत आशियाना अपार्टमेंट, रोहा या ठिकाणी तळमजल्यावर गुटखा तयार करण्यासाठीचे अन्नपदार्थ तसेच रु. ११,०५,४००/- किंमतीचा तयार गुटखा जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी श्री रशिद महमद इब्राहिम खान व श्री. गजानन गोराजी तांबे व श्री.गुडू इस्माईल शेख यांचे विरुध्द स्थानिक गुन्हा अन्वेषण, रायगड, अलिबाग यांनी खोपोली पोलिस स्टेशन येथे एफआयआर क्र. १०/२०१५ दि. ०७/०४/२०१५ दाखल केला असून पुढील तपास स्थानिक गुन्हा शाखा, रायगड, अलिबाग यांचेमार्फत सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे निडी (ता.रोहा, जि.रायगड) या गावाच्या हद्दीत उभारण्यात येणाऱ्या कार्बन डायऑक्साईड वायू प्रकल्पाला स्थानिक ग्रामस्थांचा असलेला विरोध

(१५) * **६७०६ श्री.जयंत पाटील, श्री.अनिल तटकरे :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे निडी (ता.रोहा, जि.रायगड) गावाच्या हद्दीत मुंबई-गोवा महामार्गालगत इन्फिनिटी गॅस प्रायव्हेट लि. कंपनीकडून उभारण्यात येणाऱ्या कार्बन डायऑक्साईड वायू प्रकल्पाला स्थानिक ग्रामस्थांनी विरोध केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ठिकाणी कंपनीकडून सुरु असलेले बांधकाम हे देखील बेकायदेशीर असून संबंधित कार्यालयाची परवानगी घेण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, निडी गावापासून २०० मीटरच्या आत हा प्रकल्प असल्यामुळे नागरीकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, इतर संबंधीत विभागांच्या परवानग्या न घेता कंपनीच्या सुरु असलेल्या बांधकामाबाबत शासनाने कंपनी विरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रामदास कदम : (१) होय.

(२) या प्रकल्पाला महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने उद्योग उभारण्यासाठीचे संमतीपत्र (Consent to Establishment) दिनांक १९.३.२०१५ रोजी दिलेले आहे. सदर प्रकल्प हिरव्या संवर्गामध्ये मोडत असून या प्रस्तावित प्रकल्पामधून औद्योगिक सांडपाणी, घातक कचरा यांची निर्मिती होणार नसून उत्पादन प्रक्रियेमधून कोणत्याही प्रकारचे प्रदुषित वायू उत्सर्जित होणार नाहीत. सध्या प्रकल्पाला बांधकाम सुरु असून अद्याप उत्पादन सुरु झालेले नाही.

(३) सदर प्रकल्पाचे उत्पादन अद्यापही सुरु न झाल्यामुळे नागरिकांच्या आरोग्यास धोका असण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील एक शिक्षकी शाळा बंद करण्याबाबतचा प्रस्ताव

(१६) * ८२९९ श्री.महादेव जानकर, ॲड.अनिल परब, डॉ.नीलम गोऱ्हे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सुनिल तटकरे : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात एकूण ३५०० एक शिक्षकी शाळा चालविण्यात येत आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच युडीआयएसई सन २०१४-१५ च्या अहवालानुसार मुंबईमध्ये ४६ एक शिक्षकी शाळा असल्याचे तर राज्यातील १६३ शाळांमध्ये एकही शिक्षक नसल्याचे दिनांक १३ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील एक शिक्षकी शाळा बंद करण्याचा प्रस्ताव राज्य शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, या प्रकरणी कोणता निर्णय घेण्यात आला आहे,

(५) एक शिक्षकी शाळा बंद केल्यामुळे उक्त शाळातील शिक्षकांचे समायोजन कशाप्रकारे करण्यात येणार आहे व विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून कोणती उपाययोजना करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे ?

श्री. विनोद तावडे : (१) हे खरे नाही.

(२) आर टी ई कायद्यानुसार प्रत्येक शाळेत किमान दोन शिक्षक मंजूर असल्याने ही बाब खरी नाही. युडायस २०१४-१५ दिसणारी महिती ही कार्यरत शिक्षकांची आहे. मंजूर शिक्षकांच्या दोन पदांपैकी दोनही पदे रिक्त असतील तर तेथे अन्य शाळांमधून अध्यपनासाठी शिक्षक उपलब्ध करुन देण्यात येतात.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात शासनाने सार्वजनिक ठिकाणी तंबाखू, माव्यावर घातलेली बंदी

(१७) * ७१०६ श्री.अशोक उर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.हरिसिंग राठोड, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.आनंदराव पाटील, श्री.गुरुमुख जगवानी, श्री.माणिकराव ठाकरे, श्री.शरद रणपिसे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.संदिप बाजोरिया, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.धनंजय मुंडे, श्रीमती स्मिता वाघ, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अनिल भोसले, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.अनिल तटकरे, श्री.सतिश चव्हाण, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.सुनिल तटकरे, ॲड.निरंजन डावखरे : सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासनाने सार्वजनिक ठिकाणी तंबाखू, माव्यावर बंदी घातली असूनही मुंबईतील रुग्णांलयामध्ये ठिकठिकाणी तसेच पानपट्टीवरही व जळगांव जिल्ह्यातील जळगांव शहर आणि इतर ग्रामीण भागामध्ये अनेक टपऱ्यांवर सर्रासपणे तंबाखू, माव्याची विक्री केली जात असल्याचे दिनांक २० एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी गुटखा बंदीची पायमल्ली उडविणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश बापट : (१) हे खरे नाही.

तथापि माहे एप्रिल, २०१५ ते जून, २०१५ या कालावधीत जळगाव जिल्ह्यात दोन ठिकाणाहून रु.५९४००/- चा पानमसाला व सुगंधित तंबाखु ताब्यात घेण्यात आला आहे.

मुंबईत एकूण सहा ठिकाणी गुटख्याचा रु.१९०७३५७/- चा साठा ताब्यात घेण्यात आला आहे.

(२) वरील सर्व प्रकरणी संबंधितांविरुध्द पोलीस स्टेशनमध्ये प्रथम खबरी अहवाल दाखल करण्यात आला असून, तपासाअंती संबंधितांवर मा.न्यायालयात खटले दाखल करण्यात येतील.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

चौदा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात परिचारिकांची पदे भरण्याबाबत

(१८) * ६९६६ श्री.राजेंद्र मुळक, श्री.संजय दत्त, श्री.सुभाष झांबड, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूरच्या मेडिकल, मेयोसह चौदा शासकीय वैद्यकीय महाविद्यालात व रुग्णालयात शासकीय संस्थेतील खाटांची संख्या लक्षात घेता आणखी १० हजार परिचारिकांची पदे रिक्त असल्याचे दिनांक ११ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील व रुग्णालयातील १० हजार परिचारिकांची पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१), (२), (३) व (४) नाही.

राज्यातील विविध शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात परिचर्या संवर्गाची एकूण २०१७ पदे रिक्त आहेत.

परिचर्या संवर्गातील २०१७ रिक्त पदांपैकी १४८९ सरळ सेवेतील अधिपरिचारिकांची पदे भरण्याची कार्यवाही सुरू आहे. तसेच उर्वरित पदोन्नती कोट्यातील पदे विभागीय पदोन्नती समितीमार्फत भरण्याची कार्यवाही सुरू आहे.

औरगांबाद येथे नॅशनल लॉ स्कूल सुरु करण्याबाबत

(१९) * ७४६१ श्री.सतिश चव्हाण, डॉ.सुधीर तांबे, श्री.धनंजय मुंडे, श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित : तारांकित प्रश्न क्रमांक ३९२४ ला दिनांक १२ मार्च,२०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरगांबाद येथे नॅशनल लॉ स्कूल सन २०१५-२०१६ या शैक्षणिक वर्षापासून सुरु करण्याचे दृष्टीने शासनाने कार्यवाही केली आहे काय,
(२) असल्यास, प्रत्यक्ष वर्ग सुरु करण्याचे दृष्टीने शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप, कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

श्री. विनोद तावडे : (१) व (२) नाही, प्रथम कुलगुरु नियुक्ती कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईमधील रेशन दुकानांमधुन काळ्याबाजाराने धान्याची विक्री करणाऱ्या दुकानदारांवर कारवाई करण्याबाबत

(२०) * ६८३७ श्री.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, श्री.नरेंद्र पाटील : सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईमध्ये रेशन दुकानांमधुन सर्रास काळयाबाजारात प्रत्येक किलोमागे दुकानदार पाच ते सहा पट अधिक किंमत आकारत असल्याचे दिनांक १४ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने याची पाहणी वा चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने आतापर्यंत काळयाबाजाराने धान्याची विक्री करणाऱ्या किती दुकानदारांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार : (१) हे खरे नाही. तथापि, दिनांक १५ मे, २०१५ रोजी 'दैनिक लोकमत' वृत्तपत्रामध्ये याबाबतचे वृत्त प्रसिद्ध झाले होते.
(२) होय.
(३) दिनांक १५ मे, २०१५ रोजी 'दैनिक लोकमत' वृत्तपत्रामध्ये मुंबई येथील ५ रेशन दुकानामध्ये धान्याचा काळाबाजार होत असल्याची बातमी प्रसिद्ध झाली होती. त्या अनुषंगाने पाचही दुकानाची तपासणी करण्यात आली. तपासणीत आढळलेल्या त्रुटी/दोषांच्या अनुषंगाने रास्तभाव दुकानदारांविरुद्ध कारवाई सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

पाचवीच्या पाठयपुस्तकांच्या किंमती दुप्पटीने वाढल्याबाबत

(२१) * ८३९२ श्री.संजय दत्त, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.हरिसिंग राठोड, श्री.आनंदराव पाटील : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इयत्ता पाचवीच्या अभ्यासक्रम यंदा बदलल्याने नव्यानेंच बाजारात दाखल झालेल्या पाचवीच्या पाठयपुस्तकांच्या किंमती दुप्पटीने वाढल्याने पालकवर्गात नाराजी व्यक्त केली जात असल्याचे दिनांक १६ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विविध विषयांच्या अशा अभ्यासक्रमांची पुनर्रचना करताना त्यांच्या पुस्तकांच्या किमती सर्वसामान्यांना परवडतील अशा स्वरुपात असाव्यात अशी मागणी पालकवर्गातून केली जात आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यशासनाने याची दखल घेऊन पाचवीच्या पुस्तकांची किंमत कमी करुन सर्वसामान्यांना परवडतील अशा किंमतीत विक्री करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, उक्त प्रश्नाबाबत कोणतीच कार्यवाही होत नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१), (२) व (३) सन २०१५-१६ पासून इ. ५ वीच्या अभ्यासक्रमाची पुर्नरचना करण्यात आली असून पाठयपुस्तकातील पानांचा आकार वाढवून छपाईमध्ये बदल करण्यात आला आहे. पाठ्यपुस्तकांच्या छपाईसाठी लागणारा कागद, शाई, रसायने व वाहतुक यांच्या दरात वाढ झाली आहे. सदर बाबींमुळे पाठ्यपुस्तकांच्या किंमती वाढल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात शिक्षण हक्क कायदयानुसार बालकांना मोफत शिक्षणाचा हक्क मिळणेबाबत

(२२) * ८७१३ श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.राजेंद्र मुळक, श्री.हरिसिंग राठोड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शिक्षण हक्क कायदयानुसार बालकांना मोफत शिक्षणाचा हक्क असतानाही कल्याण (जि. ठाणे) तालुक्यातील अनेक शाळांना या कायदयाची अंमलबजावणी करण्यासाठी शासनाकडून देण्यात येणारा निधी मागील वर्षापासून मिळाला नसल्याने अनेक शाळाचालक पालकांकडून विद्यार्थी शिक्षणाचे पैसे घेत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कायदयातुन ६ ते १४ वयोगटातील मुलांना मोफत शिक्षणाची तरतूद करण्यात आली आहे याची अमंलबजावणी करतांना आवश्यक असलेला निधी अद्याप प्राप्त न झाल्याने मागासवर्गीय विद्यार्थ्यांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू शाळांना त्वरित निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१), (२) व (३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

वाडा (जि.ठाणे) तालुक्यातील १५ गावांत निर्माण झालेली पाणीटंचाई

(२३) * ८८१८ श्री.जर्नादन चांदूरकर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडा (जि.ठाणे) तालुक्यात वैतरणा, तानसा, पिंजाळ देहर्जे, गारगावी या पाच नद्यांचे मुबलक पाणी असताना पाण्याचे योग्य नियोजन न झाल्यामुळे येथील १५ गावांतील ग्रामस्थांना पाण्यासाठी वणवण करावी लागत असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने पहाणी केली आहे काय,

(३) असल्यास, या १५ गावातील ग्रामस्थांना पाणीपुरवठा करण्यासंदर्भात शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, उपाययोजना केली नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर : (१) होय, हे खरे आहे.

वाडा तालुक्यातील ५ गावे व १५ वाडया अशा एकूण २० गावे/वाडयांना माहे एप्रिल, २०१५ ते माहे जून, २०१५ या कालावधीत पिण्याच्या पाण्याची टंचाई भासत असल्याचे निदर्शनास आले.

(२) व (३) टंचाईग्रस्त भागाची वेळोवेळी पाहणी करण्यात येऊन त्याप्रमाणे पाणी टंचाई कृती आराखडयानुसार टंचाई निवारणार्थ उपाययोजना घेण्यात येतात.

वाडा तालुक्यातील टंचाईग्रस्त ५ गावे व १५ वाडया अशा एकूण २० गावे/वाडयांना टंचाई जाणवणाऱ्या कालावधीत टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

नांदेड जिल्ह्यात शौचालय अनुदान वाटपात गटविकास अधिकारी आर्थिक सौदेबाजी करीत असल्याबाबत

(२४) * ८९४६ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.सुभाष झांबड : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यात शौचालय अनुदान वाटपात काही गटविकास अधिकारी आर्थिक सौदेबाजी करीत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कंधार तालुक्यातील गोरगरीब जनतेने प्रसंगी व्याजाने रक्कम घेऊन अथवा नातलगाकडून उसनवारीने पैसे घेऊन वैयक्तिक शौचालयाचे बांधकाम केले परंतु आता शौचालयाचे अनुदान देतांना मात्र कंधारचे गटविकास अधिकारी लाभार्थीसोबत आर्थिक सौदेबाजी करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने दोषापितांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर : (१) व (२) हे खरे नाही.

केंद्र पुरस्कृत स्वच्छ भारत मिशन अंतर्गत दिनांक २ ऑक्टोबर, २०१४ पासून शौचालय बांधकामाचे अनुदान सुधारीत करून रुपये १२,००० इतके करण्यात आलेले आहे. जिल्हा परिषद, नांदेड अंतर्गत कंधार तालुक्यात एकुण ११६ ग्रामपंचायती असून दिनांक ३१.३.२०१५ अखेर ४६३० शौचालयांचे बांधकाम झालेले आहे. यापैकी १७५० लाभार्थ्यांना निधीचे वाटप करण्यात आलेले आहे.

सन २०१४-२०१५ या वित्तीय वर्षात केंद्र शासनाकडून एकूण रुपये ६५५.०२ कोटी इतके अनुदान प्राप्त होणे अपेक्षित होते परंतू, प्रत्यक्षात रुपये २३६.११ कोटी इतकेच अनुदान प्राप्त झालेले आहे. त्यामुळे मागणीनुसार पूर्ण निधी जिल्हा परिषदांना वितरीत करणे शक्य झाले नाही. सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षात स्वच्छ भारत मिशन अंतर्गत जिल्हा परिषद, नांदेड मधील कंधार तालुक्यासाठी रुपये २१०.०० लक्ष एवढा निधी वितरीत करण्यात आला आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

चिपळूण (जि.रत्नागिरी) येथील वैधमापन शास्त्र यंत्रणेच्या कार्यालयाचे स्थलांतर करण्यात होत असलेला विरोध

(२५) * ९०३० श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप : सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिपळूण (जि.रत्नागिरी) येथील वैधमापन शास्त्र यंत्रणेचे कार्यालय रत्नागिरीच्या कार्यालयात विलीन करण्याचा निर्णय दिनांक १ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक नागरिक, सामाजिक कार्यकर्ते व माजी सभापती पंचायत समिती यांनी सदरचे कार्यालय हलविण्यात येऊ नये व हलविल्यास आंदोलन, उपोषण करण्याचा इशारा दिनांक २ मे, २०१५ रोजीच्या परिपत्रकाद्वारे व पत्राद्वारे जिल्हाधिकारी व जिल्हा पुरवठा अधिकारी यांना कळविले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, खेड, दापोली व मंडणगड येथील व्यापा-यांनीही रत्नागिरीला यावे लागणार असून या व्यापाऱ्यांनी ही कार्यालय हलविण्यास विरोध केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रश्न भाग १, २ व ३ च्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे व कार्यवाहीचे स्वरुप काय आहे ?

श्री. सुधीर मुनगंटीवार : (१) सदर निर्णय शासनाने घेतलेला नाही. नियंत्रक, वैध मापन शास्त्र यांनी दूरध्वनीवरुन दिलेल्या सूचनेनुसार उप नियंत्रक, वैध मापन शास्त्र, कोकण विभाग यांनी दिनांक २०.४.२०१५ रोजी आदेश निर्गमित केले आहेत.

(२) व (३) अशा प्रकारचे कोणतेही निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून आले नसल्याचे जिल्हा पुरवठा अधिकारी, रत्नागिरी यांनी कळविले आहे.

दापोली व मंडणगड या तालुक्यांसाठी दापोली येथे निरिक्षक, वैध मापन शास्त्र हे स्वतंत्र कार्यालय असून सदर कार्यालय दापोली येथेच कार्यरत आहे.

(४) याबाबत चौकशी करुन नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

राज्यातील चार हजार सरकारी शाळा घटत्या पटसंख्येमुळे शैक्षणिक वर्षात बंद पडण्याच्या मार्गावर असल्याबाबत

(२६) * ९१११ श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सुमारे चार हजार सरकारी शाळा घटत्या पटसंख्येमुळे यंदाच्या शैक्षणिक वर्षात बंद पडण्याच्या मार्गावर असल्याचे माहे मे-२०१५ च्या दरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सरकारी शाळांची झालेली दूरवस्था मध्ये वा त्या विद्यार्थ्यांचे घटत चाललेले प्रमाण, सोयी-सुविधांचा अभाव, शिक्षणाचा घसरत चाललेला दर्जा या कारणास्तव सरकारी शाळांच्या समस्या सोडवून सरकारी शाळांमधील पटसंख्या वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, उक्त प्रश्नाबाबत कोणतीच कार्यवाही होत नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) अंशतः खरे आहे.

(२) या शाळांच्या पटसंख्याविरुध्दीसाठी, शाळाबाह्य मुलांचे सर्वेक्षण करुन शाळेत दाखल करण्याचे प्रयत्न करण्यात येत आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बहुतांश शाळांत आवश्यक सुविधा उपलब्ध असून ज्या शाळांत सुविधा उपलब्ध नाहीत तेथे सुविधा उपलब्ध करण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच शिक्षणाचा दर्जा वाढविण्यासाठी विविध चाचण्या घेवून गूणवत्ता तपासण्यात येत आहे व आवश्यकतेनुसार शिक्षकांना प्रशिक्षण देण्याची कार्यवाही सुरु आहे. विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी सन २०१५-१६ पासून प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमांतर्गत राज्यातील सर्व व्यवस्थापनाच्या व सर्व माध्यमांच्या मान्यता प्राप्त शाळांमधून इयत्ता १ ली ते ८ वी तील सर्व विद्यार्थ्यांसाठी वर्षभरात ३ शैक्षणिक प्रगती चाचण्या घेण्यात येणार आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात आठव्या इयत्तेपूर्वीच १६ टक्के मुली शाळाबाह्य असल्याबाबत

(२७) * ९३०१ श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, डॉ.अपूर्व हिरे : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शाळाबाह्य मुलींच्या संख्येत घट झाली असली तरी ५३ हजार मुली अद्यापीही शिक्षणाच्या प्रवाहापासून दूर असल्याचे दिनांक २ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच आठव्या इयत्तेपूर्वीच १६ टक्के मुली शाळाबाह्य असल्याचे मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या अहवालाद्वारे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, 'लेक शिकवा अभियाना' मुळे ६५ हजार शाळाबाह्य मुली नियमित शाळेत उपस्थित राहून शैक्षणिक प्रवाहात आलेल्या असतांना, मुलीचे शाळा गळतीचे प्रमाण प्राथमिक शिक्षणात तीन टक्के तर माध्यमिक शिक्षणात सात टक्के आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार मुली शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) राज्य शासनाने केलेल्या एक दिवसीय सर्वेक्षणामध्ये २५,३५८ मुली शाळाबाह्य असल्याचे आढळून आले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) सन २०१४-१५ च्या यु-डायस वरील माहिती नुसार प्राथमिक शिक्षणात मुलींच्या गळतीचे प्रमाणे ०.९३ टक्के इतके आहे तर माध्यमिक शिक्षणात मुलींच्या गळतीचे प्रमाण ९.७५ टक्के इतके आहे.

(५) शाळाबाह्य मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात आणून शिक्षणाची गोडी निर्माण व्हावी याकरीता पटनोंदणीत वाढ करणे, गळती कमी करण्यासाठी कस्तुरबा गांधी बालीका योजना, मोफत पाठ्यपुस्तके, मोफत गणवेश योजना, अनाथ, बेघर व असंरक्षित मुलींसाठी शहरीभागात निवासी वसतिगृह योजना, अपंग मुलींना सुविधा, मुलींसाठी स्वतंत्र शौचालयांची सुविधा, उपस्थिती भत्ता यासारखे उपक्रम राबविले जात आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

नाशिक जिल्हा रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करुन नवीन वैद्यकीय महाविद्यालये स्थापन करण्याबाबत

(२८) * ९३४४ श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल भोसले : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने जिल्हा रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करुन देशात ५८ नवीन वैद्यकीय महाविद्यालये स्थापन करण्याचा निर्णय घेतल्यामूळे सदर योजनेद्वारे नाशिकच्या जिल्हा रुग्णालयाने श्रेणीवर्धन करुन नवीन वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याची लोप्रतिनिधींनी दिनांक १२ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीबाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) होय, जोपर्यंत शासन प्रस्तावित ७ शासकीय वैद्यकीय महाविद्यालये पुर्णत: कार्यान्वित होत नाहीत, तो पर्यंत नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरु करणे संयुक्तीक ठरणार नाही.

(२) व (३) प्रश्नच उद्भवत नाही.

कुडूस (ता.वाडा, जि.पालघर) ग्रामपंचायतीला पाणी योजनेसाठी प्राप्त झालेला निधी

(२९) * ९६२२ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुडूस (ता.वाडा, जि.पालघर) ग्रामपंचायतीला पाणी योजनेसाठी सन २०१४-१५ साठी ४ कोटी ५६ लाख ८५ हजार ९९६ रुपयाचा निधी प्राप्त झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाणी योजनेची कामे सुरु करताना कामासाठी लागणारी जमिन ग्रामपंचायतीच्या नांवे अधिग्रहण न करता अथवा जागा मालकाचे संमतीपत्रक न घेताच कामे सुरु करण्यात आल्याने जागा मालकानी हरकती घेतल्या आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बाब १ व २ नुसार चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने पाणी योजनेची कामे पूर्ण करण्यासाठी शासन कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, कार्यवाहीस होत असलेल्या दिरंगाईची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर : (१) अंशत: खरे आहे. वाडा (जि.पालघर) तालुक्यातील कुडूस ग्रामपंचायतीला पाणी योजनेसाठी सन २०१४-१५ साठी रु. २४५.७९ लाख निधी प्राप्त झाला आहे.

(२) होय हे खरे आहे, ग्रामपंचायत कुडूस गट क्र. ३८५ येथे टाकीचे बांधकाम पूर्ण झाल्यावर हरकत घेतल्याचे पत्र प्राप्त झाले आहे. तसेच उर्वरित ३ जागांचे बक्षिसपत्र प्राप्त असून एका जागेवर जलकुंभाचे काम पूर्ण करण्यात आले आहे. उर्वरित २ ठिकाणी पावसाळयानंतर जागेची खात्री करुन काम पूर्ण करण्यात येईल.

(३) व (४) होय चौकशी सुरु असून ग्रामपंचायत कुडूस द्वारे उपस्थित हरकती बद्दल योग्य तो पत्र व्यवहार करुन जागा मोजणीची कार्यवाही करण्यात येणार आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर स्थित इंदिरा गांधी वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय येथे रक्ताचे घटक वेगळे करणारे यंत्र उपलब्ध करण्याबाबत करावयाची कार्यवाही

(३०) * ९७५५ श्री.अनिल सोले : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर स्थित इंदिरा गांधी वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय येथे रक्ताचे घटक वेगळे करणारे यंत्र उपलब्ध नाही, हे खरे काय,

(२) असल्यास, गोरगरीब जनतेला हजारो रुपये खर्च करावे लागत असल्यामुळे रुग्णांकरीता उपरोक्त यंत्र उपलब्ध करुन देण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, किती रुग्णालयात रक्ताचे घटक वेगळे करणारे यंत्र उपलब्ध नाही ?

श्री. विनोद तावडे : (१) इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालयामध्ये रक्तघटक वेगळे करणारे "ब्लड कॉम्पोनेंट सेप्रेटर" मशीन उपलब्ध नाही.

ज्या रुग्णांना ब्लड कंपोनंटची गरज असते, त्यांना शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथील रक्तपेढीतून पुरविले जाते. कॉम्पोनेंट सेपरेशन युनिटकरीता आवश्यक काही सयंत्रे विभागात उपलब्ध झालेले आहे व उर्वरीत काही सयंत्रे उपलब्ध होण्याच्या मार्गावर आहेत. सदर यंत्रणा सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत पुरविली जाते. याविषयी संस्थास्तरावरुन संबंधितांकडे पाठपुरावा सुरु आहे.

(३) शासनाच्या अधिपत्याखालील १४ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांशी संलग्नीत असणाऱ्या एकूण रुग्णालयांपैकी ०५ संस्थेमध्ये रक्तघटक वेगळे करणारे "ब्लड कॉम्पोनेंट सेप्रेटर" मशीन उपलब्ध नाही.

राज्यातील अनाधिकृत शाळांबाबत करावयाची कारवाई

(३१) * ९९५० प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.प्रकाश गजभिये, श्री.अनिल तटकरे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिक्षण हक्क कायद्याप्रमाणे बाहय असलेल्या प्रवेशावरुन वाद सुरु असतानाच राज्यात सुमारे ६९९ मराठी व इंग्रजी माध्यमाच्या शाळा अनाधिकृत असुन या शाळात ८२ हजार विद्यार्थी शिक्षण घेत असुन त्यांच्या भवितव्याचा प्रश्न निर्माण झाल्याचे माहे मे, २००५ च्या पहिल्या सप्ताहात वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने दिनांक १९ जून, २०१० रोजी घेतलेल्या निर्णयानुसार अशा किती शाळांवर अद्यापर्यंत कार्यवाही करण्यात आली,

(३) तसेच हायकोर्टाचे शासनाची मान्यता नसलेल्या शाळा बंद करण्याचे आदेश असतानाही अशा शाळा अद्यापही सुरु असुन त्याबाबत कोणताही निर्णय घेतला जात नाही, हे ही खरे आहे काय,

(४) उक्त अनाधिकृत शाळांवर त्वरीत कारवाई करण्याबाबत तसेच सदरील शाळेत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होवू नये याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) सन २०१३-१४ च्या यु-डायस डाटा नुसार एकूण ६९९ अनाधिकृत शाळा आहेत, ही बाब खरी आहे.
(२), (३) व (४) अनधिकृत शाळा बंद करण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत असून अशा शाळांमधील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी नजीकच्या शाळेत समायोजन केले जाते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

हिंगोली जिल्हा परिषदेमार्फत इयत्ता पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणाऱ्या शालेय पोषण आहाराबाबत

(३२) * **१००२१ श्री.रामराव वडकुते :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली जिल्हा परिषदेमार्फत इयत्ता पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणाऱ्या शालेय पोषण आहार योजनेतून सहावी ते आठवीच्या विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या राष्ट्रीय मध्यान भोजन योजनेतील जेवण उघड्यावर तयार केले जात असल्याने जेवणाच्या ठिकाणी किचनशेडमध्ये घाणीचे साम्राज्य पसरले असल्याने जवळजवळ दिड लाख विद्यार्थ्यांचे आरोग्य धोक्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व तद्नुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप, कोणतीच चौकशी वा कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

जळगांव मेहरुण तलावामध्ये नागरीक सांडपाणी सोडत असल्याबाबत

(३३) * **१००९० श्री.गुरुमुख जगवानी :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव मेहरुण तलावामध्ये नागरीक सांडपाणी सोडत असल्यामुळे जैवविविधता धोक्यात आली आहे असे पर्यावरणवाद्याकडून तक्रार करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मेहरुण तलाव ६२ हेक्टरमध्ये असून त्यामध्ये वन्य प्राणी व वाघाच्या अधिवासाचा असलेल्या तलाव नैसर्गिक सौंदर्य व संपन्न गमावत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या तलावामध्ये सांडपाणी सोडत असल्याने सर्व प्राण्याचे जीव धोक्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येणार आहे ?

श्री. रामदास कदम : (१) मेहरुण तलावाच्या प्रदूषणाबाबत भारती पर्यावरण प्रतिष्ठान, जळगांव यांनी दिनांक ११/६/२०१५ रोजी आयुक्त, जळगांव महानगरपालिका यांच्याकडे निवेदन दिले आहे.

(२) व (३) मेहरुण तलावाच्या परिसरात कोणत्याही वन्यप्राण्यांचे अस्तित्व आढळून येत नाही त्यामुळे प्राण्यांचा जीव धोक्यात येण्याचा प्रश्न उद्भवत नाही. तथापि, सांडपाणी मिसळल्यामुळे तलावात प्रदूषण होत असल्याच्या तक्रारी जळगांव महानगरपालिकेकडे प्राप्त झाल्या आहेत.

(४) जळगांव महानगरपालिका क्षेत्रातील सांडपाणी मेहरुण तलावात मिसळत असल्याने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने प्रदूषण कायद्याच्या कलम ३३(अ) नुसार दिनांक १७/६/२०१५ रोजी प्रस्तावित निर्देश महानगरपालिकेस दिले आहेत. तसेच मेहरुण तलावाचे प्रदूषण रोखण्यासाठी सदर तलावाचा समावेश राज्य सरोवर संवर्धन योजनेमध्ये करण्यासाठी आयुक्त, जळगांव महानगरपालिका यांनी दिनांक ७/७/२०१४ रोजी सादर केलेला प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

तहसिलदार, वसई यांनी पुरवठा विभागाचे निरीक्षक यांच्याकडे लाच मागितल्याबाबत

(३४) * १०४२६ श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप : सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तहसिलदार, वसई यांनी पुरवठा निरीक्षक श्री.राठोड यांच्याकडे २० लाख रुपयांची मागणी केली तसेच मोठ्या प्रमाणावर गैरप्रकार करणाऱ्या रेशन दुकानदारांकडूनही २० लाख रुपयांची मागणी केली असे वसई तहसिल कार्यालयातील पुरवठा विभागाचे निरिक्षक श्री.सुनिल राठोड यांनी माहे एप्रिल, २०१५ च्या दुसऱ्या आठवड्यात मा.मुख्यमंत्री व महसूल सचिव यांना निवेदने देऊन त्यांच्या निदर्शनास आणले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,
(४) अद्यापपर्यंत कार्यवाही करण्यात आली नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार : (१), (२), (३) व (४) श्री.सुनिल राठोड, पुरवठा निरीक्षक, वसई यांनी याबाबत शासन व इतरांकडे दि. २९.१२.२०१४ रोजीच्या पत्रान्वये तक्रार केली आहे. उक्त तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी, पालघर यांनी उपजिल्हा निवडणूक अधिकारी, पालघर यांना दिलेल्या आहेत. सदर चौकशी अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

ठाणे जिल्ह्यातील कॅम्प येथील कारखान्यामधील रसायनयुक्त पाणी विना प्रक्रिया वालधुनी नदीत सोडले जात असल्याबाबत

(३५) * १०४६४ श्री.हरिसिंग राठोड, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्ह्यातील कॅम्प ५ येथे सुमारे ४५० जिल्सवॉश कारखाने आहेत या कारखान्यामधील रसायनयुक्त पाणी विना प्रक्रिया पुरातन शिवमंदीराजवळ वालधुनी नदीत सोडले जात असल्याने नदी प्रदुषित झाली असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रसायनयुक्त पाणी विनाप्रक्रिया वालधूनी नदीत सोडणाऱ्या जिन्सवॉश कारखान्यांची शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप, कार्यवाही केली नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रामदास कदम : (१) हे खरे नाही.
(२) म.प्र.नि.मंडळाने उल्हासनगर कॅम्प नं.५ परिसरातील २०५ कारखान्यांना बंदचे आदेश (पाणी पुरवठा व विद्युत पुरवठा खंडण) पारीत केलेले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईमध्ये अनेक ठिकाणी बनावट शितपेयांच्या कारखान्यावर अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी छापे टाकल्याबाबत

(३६) * १०५२४ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.किरण पावसकर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.प्रकाश बिनसाळे : सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईमध्ये अनेक ठिकाणी बनावट शितपेयांच्या कारखान्यावर अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी छापे टाकल्याची बाब दिनांक ६ जून, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बनावट शितपेयाच्या बाटलीवर छापील किंमत नसणे, वैध तारीख नसणे, उत्पादनाच्या ठिकाणाचा पत्ता नसणे इत्यादी माहिती छापण्यात आलेली नव्हती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या कारखान्यात अग्निशमन दलाचा परवाना न घेता गॅस सिलेंडरचा वापर केला जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अशा कारखान्यास महापालिकेच्या आरोग्य विभागाचा परवाना आवश्यक असताना अशा प्रकारचा कोणताही परवाना त्यांनी घेतला नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणाची चौकशी केली आहे काय वा करण्यात येत आहे काय,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश बापट : (१) होय, हे खरे आहे.

दिनांक ०५ रोजी कामाठीपुरा येथे २०१५/०६/शितपेयाच्या एका कारखान्यावर अन्न व औषध प्रशासनाच्या बृहन्मुंबई कार्यालयामार्फत छापा टाकण्यात आला आहे.

(२), होय, हे खरे आहे.

सदर प्रकरणातील विश्लेषण अहवाल प्राप्त झाले असून, अहवालात शितपेयाच्या बाटलीवर बॅच नं.व उत्पादन दिनांक नमूद नसल्याने ते मिथ्याछाप (मिसब्रँडेड) घोषित झाले आहेत.

(३), (४) व (५) कारखाना/व्यवसाय बंद करण्याची नोटीस देवून व्यवसाय त्वरीत बंद करण्यात आला आहे. विनापरवाना व्यवसाय करीत असल्यामुळे सदर कारखान्यांविरुद्ध मा.न्यायालयात खटला दाखल करण्यात येत असून मिथ्याछाप नमुन्यांप्रकरणी पेढीविरुद्ध न्यायनिर्णय प्रकरणे दाखल करण्यात येत आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

डोलवी (ता.पेण, जि.रायगड) येथील जेएसडब्ल्यू स्टील कंपनीमुळे होणाऱ्या प्रदुषणाबाबत

(३७) * १०५६० श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोलवी (ता.पेण, जि.रायगड) येथील जेएसडब्ल्यू स्टील कंपनीमुळे होणाऱ्या प्रदुषणामुळे या परिसरातील नागरीकांना दमा, खोकला, उलटी, जुलाब, डोळयांचे आजार, यासारख्या अनेक प्रकारच्या आजारांना गेल्या ६ महिन्यापासून सामोरे जावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कंपनीने प्रदुषणाची मर्यादा व नियंत्रणाबाबत कोणत्याही नियमांचे पालन केलेले नाही, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत प्रदुषण नियंत्रण मंडळाने या प्रकाराकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

श्री. रामदास कदम : (१) व (२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे जिल्ह्यातील बारामती, पुरंदर, आंबेगाव, जुन्नर तालुक्यांमध्ये पाण्याची पातळी झपाटयाने कमी होत असल्याबाबत

(३८) * १०६५० श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील बारामती, पुरंदर, आंबेगाव, जुन्नर तालुक्यांमध्ये पाण्याची पातळी मार्चपासून झपाटयाने कमी होत असल्याने तेथील जनतेने टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरु करावा अशी मागणी जिल्हाधिकारी पुणे यांच्याकडे माहे एप्रिल, २०१५ मध्ये केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तालुक्यांमध्ये टँकरने पाणीपुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, आतापर्यंत किती तालुक्यांना / गावांना टॅकर्सद्वारे पाणी पुरविण्यात आले आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर : (१) अंशतः खरे आहे.

भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे यांच्या अहवालानुसार पुणे जिल्ह्यातील बारामती तालुक्यातील निरीक्षण विहीरीच्या पाणी पातळीमध्ये ०.७५ मी.ने घट झाली आहे. मात्र आंबेगाव, जुन्नर आणि पुरंदर तालुक्यात निरीक्षण विहीरीच्या पाणीपातळीमध्ये अनुक्रमे ०.३५ मी. ०.६७ मी. आणि ०.२९ मी. इतकी वाढ झाली आहे.

जनतेमध्ये मागणी केल्यानुसार एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान बारामती येथे ८, पुरंदर येथे ३ व आंबेगाव येथे २ टँकर्स टंचाईग्रस्त वाडे/गावांना मंजूर करण्यात आले आहेत.

(२) पुणे जिल्ह्यातील बारामती, पुरंदर, आंबेगाव व जुन्नर या तालुक्यांमध्ये अद्यापपर्यंत टँकरने पाणीपुरवठा करण्याबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे.

अ.क्र.	तालुका	टँकर संख्या	गावे	वाड्या
१	बारामती	१५	७	९३
२	पुरंदर	६	३	५६
३	आंबेगाव	३	४	१०
४	जुन्नर	०	०	०

(३) पुणे जिल्ह्यामध्ये आतापर्यंत १० तालुक्यांमधील एकूण ४१ गावे व २६६ वाड्यांना ४७ टँकर्सद्वारे पाणी पुरवठा करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

केंद्रातील स्वच्छ भारत अभियानातंर्गत राज्यात शौचालय बांधण्याबाबत

(३९) * **१०७१४ श्री.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्रातील नविन सरकारने देशभरात स्वच्छ भारत अभियानाची घोषणा केली आहे, हया अंतर्गत देशभर शौचालय बांधण्यात येणार असल्याचे जाहिर करण्यात आले आहे, हे खरे आहे,

(२) असल्यास, राज्यामध्ये गेल्या सहा महिन्यात शासनाने उक्त योजने अंतर्गत कोणकोणत्या जिल्ह्यात किती शौचालये बांधली आहेत, त्यावर किती खर्च झाला आहे,

(३) अद्याप, शौचालये बांधली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर : (१) देशात दि. २ ऑक्टोबर, २०१४ पासून स्वच्छ भारत मिशनची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

राज्याच्या ग्रामीण भागात स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) ची अंमलबजावणी पाणी पुरवठा व स्वच्छता विभागामार्फत दि. २ ऑक्टोबर, २०१४ पासून तर शहरी भागात स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) ची अंमलबजावणी माहे मे, २०१५ पासून नगर विकास विभागामार्फत करण्यात येत आहे.

सदर कार्यक्रमाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार शौचालय नसलेल्या कुटुंबाना शौचालयाची सुविधा उपलब्ध करुन देण्याबरोबरच नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबतची मानसिकता निर्माण करुन नागरिकांना शौचालयाचा नियमित वापर करण्यावर भर देण्यात आला आहे.

(२) राज्याच्या ग्रामीण भागातील जिल्ह्यांमध्ये माहे जानेवारी, २०१५ ते माहे जून, २०१५ पर्यंत बांधण्यात आलेली वैयक्तीक शौचालये व त्यावरील खर्च पुढीलप्रमाणे आहे.

जिल्ह्याचे नाव	**शौचालये**	**खर्च रु. लाखात**
अहमदनगर	२२९२५	७०६.०४
अकोला	१३९६५	६३२.५९
अमरावती	९२०८	८१९.७८
औरंगाबाद	२१५१६	१३६४.६२
बीड	११३३३	८७७.१४
भंडारा	९१८४	१०४९.६३
बुलढाणा	११८५३	८६०.२३
चंद्रपूर	२३४३९	२१५१.८५
धुळे	९०७९	६१९.६
गडचिरोली	६२६१	७२९.४८
गोंदिया	४२४६	४९८.८५
हिंगोली	४८१२	३३४.५६
जळगांव	१२४६९	८३५.१४
जालना	१७३६४	८२१.६८
कोल्हापूर	९३९८	६९४.७३
लातूर	१७२३२	१२२१.८२
नागपूर	२२३४६	१६६३.२९

नांदेड	२२९६४	२५००.९१
नंदूरबार	१११२०	१२४९.७०
नाशिक	२४६०८	१६६४.७६
उस्मानाबाद	१३३८६	१०६५.७९
परभणी	५२४५	३६०.१०
पुणे	१२५८६	९४५.७६
रायगड	१०२४८	५८०.७२
रत्नागिरी	५८२२	५२५.८०
सांगली	१३२९८	१३१८.९६
सातारा	१८९३८	१८९३.५३
सिंधूदुर्ग	१०७०८	८२०.११
सोलापूर	१३४९४	३८८.२०
ठाणे+पालघर	२४३०२	२५०५.३६
वर्धा	१२८७२	५७७.११
वाशिम	८७२०	६८९.७४
यवतमाळ	२२३५४	१९६१.५२
एकूण	**४५७२९५**	**३४९२९.१४**

राज्याच्या शहरी भागात शहरे हगणदारीमुक्त करण्याचा कालबध्द कार्यक्रम तयार करण्यात आला असून माहे ऑक्टोबर, २०१५ पर्यत ५० शहरे हगणदारीमुक्त करण्याचे नियोजन नगरविकास विभागाचे आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

औरंगाबाद तालुक्यातील सुखना धरणात रॅडिको या मद्य निर्मिती करणाऱ्या कंपनीकडून विषारी रसायन सोडण्यात आल्याबाबत

(४०) * १०७२३ श्री.सुभाष झांबड, श्री.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद तालुक्यातील सुखना धरणात शेंद्रा औद्योगिक वसाहतीतील रॅडिको या मद्य निर्मिती करणाऱ्या कंपनीकडून गेल्या दोन वर्षापासून कोणतीही प्रक्रिया न करता विषारी रसायन सोडण्यात येत असल्याचे माहे मे जून, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विषारी रसायनयुक्त पाण्यामुळे नागरिकांच्या जीवास धोका निर्माण झालेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने संबधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रामदास कदम : (१) हे अंशतः खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रस्तुत प्रकरणी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळामार्फत केलेल्या पाहणीअंती सदर कंपनीस दिनांक १२ जून, २०१५ रोजी जल कायदा, कलम ३ (अ) अंतर्गत प्रस्तावित निर्देश बजावण्यात आले. तसेच दिनांक २४ जून, २०१५ रोजी सदर कंपनीसमवेत सुनावणी घेण्यांत येऊन महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळामार्फत सदर कंपनीला मळीपासून मद्य निर्मिती करणारा विभाग बंद करण्याचे आदेश देण्यांत आले आहेत. सद्यःस्थितीत कारखाना बंद अवस्थेत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

गेवराई (जि. बीड) येथील शासकीय गोदामामध्ये
६७२ क्विंटल धान्य कमी आल्याबाबत

(४१) * **१०८३७ श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गेवराई (जि. बीड) येथील शासकीय गोदामामध्ये ६७२ क्विंटल धान्य कमी आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत उच्चस्तरीय चौकशी करुन गोदाम किपर यांना निलंबित केले होते, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने तहसिलदारावर ताशेरे ओढून निलंबनाचे आदेश देण्याबाबत विभागीय आयुक्तांना सूचना दिल्या होत्या, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर आदेशाची अंमलबजावणी करण्यात आली आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाचे कारणे काय आहे ?

श्री. सुधीर मुनगंटीवार : (१) होय. दिनांक ५.२.२०१५ रोजी गेवराई जि.बीड येथील शासकीय गोदामाची तपासणी केली असता ६७२.१५९४८ क्विं. तांदूळ व १२५८३ नगर रिकामा बारदाना कमी आढळून आला आहे.

(२) जिल्हाधिकारी, बीड यांच्या दिनांक ३.३.२०१५ रोजीच्या आदेशान्वये संबंधीत गोदाम रक्षक श्री.महाकुडे यांना निलंबित करण्यात आले आहे.

(३), (४) व (५) नाही. तथापि दिनांक १० मार्च, २०१५ रोजीच्या पत्रान्वये संबंधित कर्मचारी/अधिका-यांच्या विभागीय चौकशीच्या सूचना विभागीय आयुक्त औरंगाबाद यांना दिल्या आहेत.

राज्यात आयआयटी कोर्सेसच्या शुल्कात वाढ करण्यासाठी संस्थांनी केलेली मागणी

(४२) * १०८९१ ॲड.जयदेव गायकवाड, श्री.ख्वाजा बेग, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आयआयटी कोर्सेसच्या शुल्कातून शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे पगार भागविणे शक्य व्हावे यासाठी कोर्सेससाठी शुल्क वाढविण्याची मागणी संस्थाचालकांनी माहे एप्रिल, २०१५ दरम्यान मा. मुख्यमंत्री, मा.उच्च तंत्र शिक्षण मंत्री आदिकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) नाही.

(२) आय.आय.टी. ही शैक्षणिक संस्था मानव संसाधन विकास मंत्रालय, भारत सरकार नवी दिल्ली या केंद्र शासनाच्या प्रशासकीय विभागाच्या अखत्यारीतील संस्था आहे. यास्तव आय.आय.टी. या शैक्षणिक संस्थेच्या कोर्सेसचे शुल्क तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे पगार याबाबीही केंद्रशासनाच्या अखत्यारीतील असल्याने या प्रकरणी राज्य शासनाने कार्यवाही करणे अपेक्षित नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर येथील शासकीय आयुर्वेद महाविद्यालयात आवश्यक औषधांसाठी लागणारा वाढीव निधी शासनाने न दिल्याबाबत

(४३) * ७३०२ श्री.नागो गाणार, श्री.अनिल सोले, श्री.रामनाथ मोते, श्री.मितेश भांगडिया : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील शासकीय आयुर्वेद महाविद्यालयात रुग्णांची वाढीव संख्या, औषधांच्या वाढीव किंमती व त्या प्रमाणात सद्य परिस्थितीत मिळणारा निधी कमी पडत असल्याने आणि ती वाढवून देण्याबाबतचा प्रस्ताव महाविद्यालयातर्फे शासनास सादर करण्यात आलेला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हा प्रस्ताव अद्यापपर्यंत मंजूर न करण्याची कारणे कोणती,

(३) असल्यास, हा वाढीव निधी शासन त्वरीत उपलब्ध करुन देणार आहे काय ?

श्री. विनोद तावडे : (१) नाही.

शासकीय आयुर्वेद रुग्णालय, नागपूरकरिता औषधे खरेदीसाठी सन २०१४-२०१५ च्या अर्थसंकल्पात रु.२५,००,०००/- व सुधारित अंदाजात रु.३०,८४,०००/- अशी तरतूद करण्यात आली होती व मार्च, २०१५ अखरे कोणतेही देयक प्रलंबित नाही.

त्याचप्रमाणे अर्थसंकल्पीय अंदाजानुसार सन २०१५-२०१६ करिता औषध खरेदीसाठी रु. २४,००,०००/- इतकी तरतूद करण्यात आलेली आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

सेवेत असताना मृत्यू झाल्यास शिक्षकांच्या कुटूंबियांस आर्थिक मदत देण्याबाबत

(४४) * ७५८७ डॉ.सुधीर तांबे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.हरिसिंग राठोड : तारांकित प्रश्न क्रमांक ५२११ ला दिनांक १२ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुदानित संस्थांमधील प्राथमिक, माध्यमिक, व उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षक व शिक्षकेत्तर सेवेत असताना मृत्यू झाल्यास त्यांच्या कुटुंबियांना शासनाकडून देण्यात येणारी ६० हजाराची मदत वित्त विभागाने आर्थिक तरतूद न केल्यामुळे गेल्या ५ वर्षामध्ये मिळाली नसल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हा निधी तात्काळ वित्त विभागाकडून उपलब्ध करुन संबंधितांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) होय, हे खरे आहे.

(२) सन २०१४-१५ या आर्थिक वर्षामध्ये ७४७ लाभार्थिंसाठी रु.४३,२६५ हजार इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर जिल्ह्यातील कामठी व मौदा तालुक्यातील पाणी टंचाईबाबत

(४५) * **८२६७ श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यातील कामठी व मौदा तालुक्यात १५ वर्षापासून पाणी टंचाई आहे, हे खरे आहे काय

(२) तसेच पोलीस संरक्षणाअभावी पाण्याच्या पाईपला मोठया पाईपलाईन जोडण्यास प्रशासन अपयशी ठरले आहे काय, हे ही खरे आहे काय,

(३)असल्यास, जलप्रदाय विभागाचे कनिष्ठ अभियंता १५ दिवसापासून कामावर उपस्थित राहत नसल्यामुळे पाणीपुरवठा व्यवस्थेवर परिणाम झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, कामठी व मौदावासियांना नियमित पाणी मिळावे म्हणून कोणत्या उपाययोजना केल्या व करण्यात येत आहेत,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर : (१) हे अंशतः खरे आहे.

नागपूर जिल्ह्यातील कामठी तालुक्यात मागील १५ वर्षापैकी ५ वर्षात तर मौदा तालुक्यात ४ वर्षात पाणीटंचाई निवारणार्थ प्रतिवर्षी फक्त एका टँकरद्वारा पाणी पुरवठा करण्यात आला आहे.

(२) हे खरे नाही.

कामठी नगरपालिका अंतर्गत कामठी शहरातील हबाबपुरा भागात पाणीपुरवठा योजनेस पाईपलाईन जोडणीसाठी नागरीकांचा विरोध होता. तथापि, आता पाईपलाईन जोडणी करण्यात आली आहे.

(३) हे खरे नाही.

कामठी नगरपालिकेतील जलप्रदाय विभागाचे कनिष्ठ अभियंता यांच्या रजेच्या कालावधीत जलप्रदाय अधीक्षक काम पहात असल्याने कामठी शहरातील पाणी पुरवठा व्यवस्थेवर परिणाम झाला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) कामठी शहरास नळ पाणी पुरवठा योजनेद्वारा नियमित पाणीपुरवठा सुरू आहे तर मौदा शहरास ०.९६ एम.एल.डी.चे जलशुद्धीकरण केंद्राद्वारा पाणी पुरवठा सुरू असून ३ एम.एल.डी.च्या जलशुद्धीकरण केंद्राचे काम प्रगतीपथावर आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

आदिवासी व नक्षलग्रस्त भागातील शिक्षक एकस्तर वेतन श्रेणीपासून वंचित असल्याबाबत

(४६) * ९८६१ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक १६१५ ला दिनांक ९ डिसेंबर,२०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात: सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.एस.एस.एन १००७/(१६६/०७)/माशि-२, दिनांक १४ ऑगस्ट, २००८ नुसार फक्त बदली पात्र असलेले मान्यता प्राप्त अशासकीय शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांना ते नक्षलग्रस्त आदिवासी क्षेत्रात कार्यरत असेपर्यंतच ६ वर्षे कमाल एकस्तर वेतनश्रेणीचा लाभ अनुज्ञेय आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बाहेरील क्षेत्रातुन नक्षलग्रस्त व आदिवासी क्षेत्रात सेवेसाठी येणाऱ्या कर्मचाऱ्यांना एकस्तर वेतनश्रेणीचा लाभ मिळत असतांना वर्षानुवर्षे नक्षलग्रस्त व आदिवासी क्षेत्रात कार्य करणाऱ्या स्थानिक कर्मचाऱ्यांना मात्र या लाभापासून वंचित रहावे लागते आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, एकाच ठिकाणी सेवेत असलेल्या कर्मचाऱ्यास या भेदपुर्ण वेतनश्रेणीमुळे भेदभावाची भावना निर्माण झालेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सर्व कर्मचा-यांकडून उत्तम सेवा व कार्यक्षम प्रशासन व सुयोग्य कार्यालयीन कामाचे दृष्टीने सरसकट सर्वच कर्मचारी जे नक्षलग्रस्त व आदिवासी क्षेत्रात नियुक्तीस आहेत, त्यांना एकस्तर वेतनश्रेणीचा लाभ देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, त्याचे स्वरुप काय आहे ?

श्री. विनोद तावडे : (१) व (२) हे खरे आहे, नक्षलग्रस्त क्षेत्राबाहेरील होतकरु, संवेदनशील व कार्यक्षम कर्मचारी/अधिकारी अशा क्षेत्रामध्ये काम करण्यास तयार नसतात म्हणून त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी सदर योजना असून स्थानिक कर्मचाऱ्यांना हा लाभ देता येणार नाही.

(३) व (४) आदिवासी व नक्षलग्रस्त भागात कायम काम करणाऱ्या शिक्षकांना सरसकट एकस्तर वेतनश्रेणीचा लाभ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

शासकीय तंत्रनिकेतनमधील कंत्राटी अधिव्याख्यातांना नियमित करणेबाबत

(४७) * ७५१३ श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.किरण पावसकर, श्री.सतिश चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, डॉ.सुधीर तांबे, श्री.दत्तात्रय सावंत : तारांकित प्रश्न क्रमांक ३७७३ ला दिनांक ९ एप्रिल, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय तंत्रनिकेतनमध्ये कार्यरत कंत्राटी अधिव्याख्यात्यांच्या सेवा नियमित करणेबाबत मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने शासनाने ३ वर्ष सेवा पूर्ण केलेल्यास अधिव्याख्यातांना नियमित करुन पदस्थापना दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) शासकीय वरिष्ठ महाविद्यालयात ३ वर्षे सेवा पूर्ण केलेल्या कार्यरत कंत्राटी व तदर्थ अधिव्याख्यातांना नियमित करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप सेवेत असलेल्या ३ वर्षापेक्षा कमी सेवा झालेल्या शासकीय तंत्रनिकेतनमधील कंत्राटी अधिव्याख्यातांना नियमित करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(४) उपरोक्त प्रकरणी अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, होणाऱ्या विलंबाची सविस्तर कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) होय हे खरे आहे.

(२) संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांच्या अधिपत्याखालील शासकीय महाविद्यालये/संस्थांमध्ये कार्यरत असलेल्या कंत्राटी अधिव्याख्यात्यांनी त्यांच्या सेवा नियमित करण्याबाबत दाखल केलेल्या याचिकांपैकी मूळ अर्ज क्र.७८१/२०१३ व इतर मूळ अर्जांमध्ये मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधीकरणाने कंत्राटी अधिव्याख्यात्यांच्या सेवा नियमित करण्याचा निर्णय दिनांक २६/६/२०१५ रोजी दिला आहे. सदर निर्णयाविरोधात मा.उच्च न्यायालयात अपिल करण्याचे विचाराधिन आहे.

(३) सदर बाब न्यायप्रविष्ठ आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

रायगड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक विभागात सी.ई.टी. पुर्नमुल्यांकनात पात्र ठरलेल्या शिक्षकांच्या नियुक्तीबाबत

(४८) * ८०६५ श्री.रामनाथ मोते, श्री.नागो गाणार, डॉ.अपूर्व हिरे : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हा परिषदेच्या इ.६ वी ते इ. ८ वी चे वर्ग असलेल्या प्राथमिक शाळांची संख्या किती आहे,
(२) इ.६ वी ते इ.८ वीसाठी आर.टी.ई नुसार डी.एड अथवा बी.एड सह पदवीधर असलेल्या शिक्षकांच्या किती जागा रिक्त आहेत,
(३) पदवीधरांच्या रिक्त जागेवर पात्रताधारक शिक्षकांच्या पदवीधर पदांवर नियुक्त्या न करण्याचे कारण काय आहे,
(४) शिक्षण संचालक व परीक्षा परिषदेने पाठविलेल्या ११८ शिक्षकांना जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये व १५ शिक्षकांना नगरपालिकेच्या शाळेमध्ये अद्यापही नियुक्त्या न देण्याची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) रायगड जिल्हा परिषदेच्या इ. ६ वी ते ८ वीचे वर्ग असलेल्या प्राथमिक शाळांची संख्या ६७९ इतकी आहे.
(२) इ. ६ वी ते इ. ८ वी साठी आर.टी.ई. नुसार डी.एड अथवा बी.एड सह पदवीधर असलेल्या शिक्षकांच्या १०६२ जागा रिक्त आहेत.
(३) व (४) मा. उच्च न्यायालयाने संचमान्यतेच्या दिनांक १३/१२/२०१३ च्या शासन निर्णयावर "जैसे थे" परिस्थिती राखण्याचे आदेश दिलेले आहेत.

करंजी व वडकुली (ता.गोडपिंपरी, जि.चंद्रपूर) या गावातील पाणीपुरवठा योजनेमध्ये झालेला गैरव्यवहार

(४९) * ९७७३ श्रीमती शोभाताई फडणवीस : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) करंजी व वडकुली (ता.गोडपिंपरी, जि.चंद्रपूर) या गावातील पाणीपुरवठा योजनेच्या परमडोली येथील समितीने पहिल्या हफ्त्यातील २ लाख ८१ हजार ८३७ रुपयाची अफरातफर केल्याचे दिनांक १ जून, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दोषी संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर : (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, मौ. करंजी पाणीपुरवठा योजनेसंदर्भात गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गोडपिंपरी यांचेकडून तर मौ.वडकुली पाणीपुरवठा योजनेसंदर्भात जिल्हास्तरीय चमूकडून चौकशी करण्यात आली.

(३) मौजा करंजी पाणीपुरवठा योजना संदर्भात ग्राम आरोग्य पाणीपुरवठा व स्वच्छता समितीचे अध्यक्ष, सचिव व कंत्राटदार यांचेवर दि. ८/३/२०१५ रोजी व मौजा वडकुली पाणी पुरवठा योजनासंदर्भात ग्राम आरोग्य पोषण पाणीपुरवठा व स्वच्छता समितीचे अध्यक्ष व सचिव यांचेवर दिनांक २०/३/२०१५ रोजी पोलीस स्टेशन गोंडपिंपरी येथे FIR नोंदविण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात गर्भपाताच्या औषधाची काळ्याबाजारात मोठ्या प्रमाणावर होत असलेली बेकायदा विक्री

(५०) * ७७४२ श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.रामराव वडकुते, श्री.ख्वाजा बेग, श्री.किरण पावसकर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अनिल भोसले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.राजेंद्र मुळक, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.अनिल तटकरे, श्री.संदिप बाजोरिया, श्रीमती स्मिता वाघ, श्री.माणिकराव ठाकरे, श्री.शरद रणपिसे, श्री.आनंदराव पाटील, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे : सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉक्टरांच्या प्रिस्क्रीप्शन शिवाय विकण्यास बंदी घातलेली आणि जी औषधे घेतल्याने शरीरास अपाय होऊ शकतो अशी औषधे विक्री करण्यास अन्न व औषध प्रशासनाने बंदी घातलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) राज्यात स्त्रीभ्रुणहत्या विरोध मोहीम राबविली जात असतांना ऑनलाईन औषध विक्रीच्या बेबंद बाजारामुळे गर्भपाताच्या औषधांचे किटही ऑनलाईन विक्रीच्या वेबसाईटवरुन सर्रास सवलतीच्या दरात मिळत असल्याचे माहे एप्रिल, २०१५ च्या शेवटच्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईतील गोरेगाव (पश्चिम) येथील स्नॅपडील कंपनीच्या कार्यालयातून वियाग्रा आणि ॲस्कोरील उत्तेजक औषधांचे ऑनलाईन डील करीत असल्याने अन्न व औषध प्रशासन विभागाने छापा टाकून मोठ्या प्रमाणात या औषधांचा साठा जप्त केला, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार गर्भपाताच्या औषधांच्या किटची तसेच वियाग्रा आणि ॲस्कोरील उत्तेजक औषधांचे विक्री ऑनलाईन होवू नये म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश बापट : (१) औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० व त्याखालील नियम १९४५ मधील नियम ६५ नुसार अनुसूची H व X मधील औषधे डॉक्टरांच्या लेखी सल्ल्याशिवाय विकण्यास मनाई आहे.

(२) हे खरे नाही.

गर्भपाताचे किट्स ऑनलाईन सर्रास सवलतीच्या दरात मिळत असल्याचे निदर्शनास आलेले नाही. तथापि, एका शॉपक्लुज.कॉम या संकेतस्थळावरुन विना प्रिस्क्रीप्शन, विना परवाना Mifegest Abortion Kit Tablets उत्पादक, मे.झायडस हेल्थकेअर, सिक्कीम या औषधांची विक्री झाल्याचे आढळले आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

सदर प्रकरणी अन्न व औषध प्रशासनामार्फत दि.१६/४/२०१५ रोजी स्नॅपडील कंपनीच्या गोरेगाव (प), मुंबई कार्यालयास भेट देऊन चौकशी करण्यात आली. तथापि, सदर जागेतून कोणत्याही प्रकारचा औषधांचा साठा आढळून आला नाही.

(४) होय,

(५) अ) सदर प्रकरणी स्नॅपडिल कॉमची संस्था मे.जस्पर इंफोटेक प्रा.लि. या संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, संचालक, विक्रेते यांचेविरुध्द पनवेल शहर पोलिस ठाणे पनवेल येथे एफआयआर क्र.II ११०/२०१५ दि.१/५/२०१५ अन्वये विना परवाना औषध विक्री व इतर उल्लंघनाबाबत गुन्हा दाखल केला आहे.

ब) तसेच शॉपक्लुज कॉम ची संस्था मे.क्लुज नेटवर्क प्रा.लि.या संस्थेचे संचालक विक्रेते यांचे विरुध्द पनवेल शहर पोलिस ठाणे येथे एफआयआर क्र.II ११/२०१५, दि.७/५/२०१५ अन्वये विना परवाना औषध विक्री व इतर उल्लंघनाबाबत गुन्हा दाखल केला आहे.

क) अशा प्रकारच्या उल्लंघनांना आळा घालण्यासाठी योग्य कारवाई घेण्याबाबत औषध नियंत्रक, भारत सरकार यांना दिनांक २८/४/२०१५ अन्वये आयुक्त अन्न व औषध प्रशासन यांनी कळविले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

गेवराई तालुक्यातील पाणी टँकरच्या अनियमिततेबाबत

(५१) * १०२३८ श्री.अमरसिंह पंडित, श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.सतिश चव्हाण, श्री.धनंजय मुंडे : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गेवराई तालुक्यातील पाणी टँकरच्या अनियमिततेबाबत चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे आदेश तहसिलदार, गेवराई यांनी दिनांक ९ जून, २०१५ रोजी गटविकास अधिकारी, पंचायत समिती, गेवराई यांना दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेवराई (जि.बीड) तालुक्यात जवळचा उद्भव उपलब्ध असताना कंत्राटदाराचे हित जोपासण्यासाठी त्यांना दुरचे उद्भव देण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, टँकर कंत्राटदाराने जी.पी.एस. प्रणालीचा वापर न करणे, मंजूर खेपांपेक्षा कमी खेपा करणे यांसह अनेक तक्रारी तालुक्यातील लोकप्रतिनिधी व ग्रामस्थांनी जिल्हाधिकाऱ्यांसह तहसिलदार व गटविकास अधिकारी यांच्याकडे दाखल केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ग्रामस्थ व लोकप्रतिनिधी यांच्या तक्रारी तसेच तहसिलदार, गेवराई यांचे उक्त आदेश याबाबबत झालेल्या चौकशीनुसार दोषीविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, टँकर कंत्राटदाराविरुध्द करण्यास झालेल्या विलंबाची कारणे कोणती ?

श्री. बबनराव लोणीकर : (१) होय. हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

सर्व उद्भव योग्य असल्याचे तपासून देण्यात आलेले आहेत.

(३) होय. हे खरे आहे.

अशा प्रकारच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.

(४) जी.पी.एस.प्रणालीचा वापर करण्यात येत असून त्यानुसार टँकरच्या खेपांची नोंद होत आहे. जी.पी.एस.प्रणालीवर नोंद झाल्यानुसारच टँकरची देयके अदा करण्यात येतात. त्यामुळे दोषींविरुद्ध कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील नदीपात्रात कारखान्यातील रसायन मिश्रित पाणी मिसळल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आल्याबाबत

(५२) * ८८६९ **श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.सुनिल तटकरे :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्रमुख नद्यांमध्ये धोकादायक प्रमाणात प्रदूषण पसरले असल्याने या नद्या मृतवत बनल्या असुन नगर, मराठवाडयापर्यंत आणि मुंबईपर्यंत पाणीपुरवठा करणाऱ्या नाशिकमधील नद्यांची स्थिती अत्यंत वाईट असून नद्या जिवंत ठेवणारे जलस्त्रोत मृत होत असुनही संबंधित यंत्रणा आवश्यक कार्यवाही करीत नसल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) बोरगांव (ता.वाळवा, जि.सांगली) येथील कृष्णा नदीच्यापात्रात कारखान्याचे रसायन मिश्रित पाणी मिसळल्याने हजारो मासे मृत्यूमुखी पडल्याचे व मृत माशांमुळे नदीचे पाणी प्रदुषित होऊन दुर्गंधी पसरल्याने नागरीकांचे आरोग्य धोक्यात आल्याची घटना माहे मे, २०१५ च्या दुसऱ्या आठवड्यात घडली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे व त्यानुसार प्रदूषण रोखण्याचे दृष्टीने कोणती प्रतिबंधात्मक उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, चौकशी वा प्रतिबंधात्मक उपाययोजना केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रामदास कदम : (१) हे खरे नाही.

(२) हे अंशतः खरे आहे.

सांगली जिल्ह्यामध्ये कृष्णा नदीच्या दूषित पाणी व पसरलेल्या दुर्गंधीमुळे जलजन्य आजाराचे रुग्ण आढळून आले नाहीत.

(३) होय.

चौकशीअंती नदी प्रदुषणास जबाबदार उद्योगांवर मंडळाकडून कार्यवाही केली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

अनुदानित/अंशत: अनुदानित/ विनाअनुदानित शाळांतील बंद झालेल्या तुकडयांबाबत

(५३) * **७६७४ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अनुदानित/अंशत: अनुदानित/ विनाअनुदानित शाळांतील बंद झालेल्या तुकडयांबाबत दिनांक २५ मे, २०१२ रोजीच्या शासन निर्णयाची पूर्ण अंमलबजावणी उपसंचालक, मुंबई कार्यालयाकडून झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिल्लक बंद तुकडयांचे समायोजन मागणीप्रमाणे मुंबई व ठाणे/पालघर/ रायगड या मुंबई विभागातील सर्व जिल्ह्यामध्ये करण्याबाबत उपसंचालकांनी काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, नव्या शैक्षणिक वर्षात ही कार्यवाही पूर्ण करण्याबाबत शिक्षण संचालकांनी आदेश दिले आहेत काय ?

श्री. विनोद तावडे : (१) अंशतः खरे आहे.

(२) शासन निर्णय दिनांक २५.५.२०१२ मधील सूचनांप्रमाणे विभागीय शिक्षण उपसंचालक मुंबई यांनी सन २०११-२०१२ मध्ये २८९ तुकड्यांचे व सन २०१२-२०१३ मध्ये ७८ तुकड्यांचे असे मिळून एकूण ३६७ तुकड्यांचे समायोजन केलेले आहे.

(३) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) यांनी अशा स्वरुपाचे आदेश दिलेले नाही.

काल्हेर (ता.भिंवडी, जि.ठाणे) येथील केयुर औषध कपंनीच्या गोदामावर केंद्रीय उच्च औषध नियंत्रण पथकाने टाकलेला छापा

(५४) * ९४९८ श्री.नरेंद्र पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.किरण पावसकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.आनंद ठाकूर, श्री.धनंजय मुंडे, श्री.संदिप बाजोरिया : सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) काल्हेर (ता.भिंवडी, जि.ठाणे) गावाच्या हद्दीतील श्री अरिहंत कंपाऊंडमधील केयुर औषध कपंनीच्या गोदामावर केंद्रीय उच्च औषध नियंत्रण पथकाने दिनांक ११ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास छापा टाकला, हे खरे आहे काय,

(२) तसेच या कंपनीवरील कारवाई दडपण्यासाठी कपंनीचे उप संचालक दिल्लीवरुन थेट काल्हेर या गावी आले असल्याने कारवाई स्थगित करण्यांत आली, हे ही खरे आहे,

(३) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व तदनुसार व्यवस्थापनावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश बापट : (१) हे अंशत: खरे आहे.

तथापि, छापा टाकला नसून, दिनांक ११/०५/२०१५ रोजी केंद्रिय औषध निरीक्षक, सीडीएससीओ, मुंबई यांनी मे.फायझर लि., सी ॲन्ड एफ. केयुर एजन्सी, काल्हेर, भिवंडी, जि.ठाणे यांचेकडे चौकशीसाठी भेट दिली होती.

(२) हे खरे नाही.

(३) होय,

(४) सदर भेटीत दोन औषध नमुने चाचणी व विश्लेषणासाठी घेण्यात आले असून ते केंद्रिय औषध नियंत्रण प्रयोगशाळा, मुंबई यांचेकडे पाठविले असून त्याचे अहवाल प्रलंबित आहेत.

दिनांक १८/०६/२०१५ रोजी दोन केंद्रिय औषध निरीक्षकांनी अन्न व औषध प्रशासनाच्या औषध निरीक्षकांसमवेत संयुक्तरित्या भेट देवून केलेल्या चौकशीत एक नमुना चाचणी व विश्लेषणासाठी केंद्रिय औषध नियंत्रण प्रयोगशाळा, मुंबई यांचेकडे चाचणी व विश्लेषणासाठी पाठविला असून, अहवाल प्रलंबित आहेत.

सदर प्रकरण हे औषधांच्या आयात व लेबलिंग बाबत असल्याने केंद्रिय औषध निरीक्षकामार्फत पुढील चौकशी व कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे जिल्ह्यातील पडघे जवळील भादाणे गावाच्या हद्दीत असलेल्या जय आनंद फूड इंडस्ट्रीजमध्ये रेशनींगचे धान्य विकल्याबाबत

(५५) * ६७१७ श्री.जयंत पाटील, श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.नरेंद्र पाटील, श्री.राजेंद्र मुळक, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.हरिसिंग राठोड, श्री.किरण पावसकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सुनिल तटकरे, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.धनंजय मुंडे, श्री.अनिल तटकरे, श्री.संदिप बाजोरिया, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अनिल भोसले : सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील आदिवासी भाग आणि वसई, काशीमीरा, बोरीवली या परिसरातून काळ्या बाजारात विकण्यासाठी आणलेल्या रेशनींग धान्याच्या ६०० गोणी पडघे जवळील भादाणे गावाच्या हद्दीत असलेल्या जय आनंद फूड इंडस्ट्रीज नावाच्या फ्लोअर मिलमध्ये कल्याण-मुंबई परिसरातील रेशनिंगवर पुरविण्यात येणारा गहू पीठ, रवा, मैदा तयार करुन खुल्या बाजारात विकला जातो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शनिवार दि. २ मे, २०१५ रोजी जिल्हाधिकारी, ठाणे यानी जिल्हा पुरवठा पथकासह धाड टाकून सुमारे ७१ लाख ९९ हजार रुपयांचा गहू पीठ, रवा, मैदा जप्त केला, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी जय आनंद फूड चा मालक लखन पटेल, व्यवस्थापक विक्रम रवी इत्यादींवर पडघा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) त्यानुसार दोषी संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश बापट : (१) व (२) जिल्हा पुरवठा अधिकारी, ठाणे यांनी मौ. भादाणे, ता.भिवंडी येथील जय आनंद फूड इंडस्ट्रीजवर दि. ०२ मे, २०१५ रोजी टाकलेल्या धाडीत प्रती ५० किलो वजनाच्या गव्हाच्या २४१३ गोणी व ४०,००० किलो सुटा गहू याप्रमाणे सुमारे ७१.९९ लक्ष किंमतीचा माल जप्त करण्यात आलेला आहे. जप्त केलेले धान्य निश्चित कोठून आलेले आहे, याबाबत तपास सुरु आहे.

(३) व (४) सदर प्रकरणी लक्ष्मण उर्फ लखन पटेल, राकेशकुमार डागोर, विक्रम शिर्के, रवि चौहान, अश्फाक मोहंमद अन्सारी, बच्चेलाल मंडल, भोला मिस्त्री व संदिप कल्लू यांचेविरुध्द दि. ०३, मे २०१५ रोजी, जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ३ व ७ प्रमाणे पडघा पोलीस स्टेशनमध्ये गु.रजि.क्र. ॥ ०६/२०१५, दाखल करण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयांमध्ये नियमित प्राचार्य नसल्याबाबत

(५६) * ८५७८ श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.राजेंद्र मुळक, श्री.संजय दत्त : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाशी संलग्न असलेल्या ४१६ महाविद्यालयापैकी २६९ महाविद्यालयांमध्ये नियमित प्राचार्य नसल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे शैक्षणिक कामकाजावर विपरीत परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ज्या महाविद्यालयात प्राचार्याच्या नेमणुका अद्यापर्यंत झालेल्या नाहीत, अशा महाविद्यालयांनी प्राचार्याच्या नेमणूका त्वरीत कराव्यात यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) अंशत: खरे आहे.

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठांतर्गत ४१६ महाविद्यालयापैकी अशासकीय अनुदानित महाविद्यालयात प्राचार्यांची ४६ पदे, अशासकीय कायम विना अनुदानित महाविद्यालयात प्राचार्यांची २०१ पदे, तसेच शासकीय, अभियांत्रिकी, फार्मसी व समाजकार्य महाविद्यालयात प्राचार्यांची २४ पदे रिक्त आहेत.

(२) नाही.

सेवाजेष्ठ शिक्षकाला प्राचार्य पदाचा अतिरिक्त कार्यभार देऊन शैक्षणिक व प्रशासकीय कार्यभार चालविला जात असल्याने, कामकाजावर वितरीत परिणाम झालेला नाही.

(३) विद्यापीठाने प्राचार्यांची पदे भरण्याबाबत वारंवार पत्रे पाठवून संबंधितांना सूचना दिल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर येथील शासकीय मेडीकल कॉलेज, सुपर स्पेशॉलिटी हॉस्पिटल व शासकीय दंत विद्यालयात साधनसामुग्री खरेदी करण्याकरीता देण्यात आलेल्या निधीबाबत

(५७) * **८६८२ श्री.राजेंद्र मुळक, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हा नियोजन समितीने सन २०१४-१५ मधील नागपूर येथील शासकीय मेडीकल कॉलेज, सुपर स्पेशॉलिटी हॉस्पिटल व शासकीय दंत विद्यालयात साधनसामुग्री खरेदी करण्यासाठी निधी दिला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने त्यास मंजूरी दिली नसल्याने उक्त रक्कम वापरता आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यामागील सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) हे खरे आहे.

वित्तीय वर्ष २०१४-१५ मध्ये नागपूर जिल्हा नियोजन समितीने जिल्हा वार्षिक योजनांतर्गत नागपूर येथील शासकीय वैद्यकीय/दंत महाविद्यालय व रुग्णालये करीता एकूण रु. ८.४६ कोटी इतका निधी यंत्रसामुग्री खरेदीकरीता उपलब्ध करुन दिला होता.

(२) व (३) हे अंशत: खरे आहे,

जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत सन २०१४-१५ मध्ये उपलब्ध निधीपैकी संस्थास्तरावर रु. ५९.०९ लक्ष इतका निधी खर्च करण्यात आला आहे. उर्वरीत निधीमधून यंत्र खरेदीचे शासनास प्राप्त झालेल्या प्रस्तावांमध्ये काही प्रमाणात त्रुटया असल्याने, निविदा प्रक्रियेतील प्राप्त तक्रारीचे निरसन करणे, इत्यादी कारणांस्तव निविदा प्रक्रिया विहीत मुदतीत अंतीम करणे शक्य झाले नाही. शासन परिपत्रक वित्त विभाग दिनांक ११.२.२००० अन्वये दिनांक १५ फेब्रुवारी अथवा तद्नंतर यंत्रसामुग्री खरेदी प्रस्तावास मंजूरी देऊ नये, असे आदेश आहेत. परिपत्रकातील सदर तरतूदीमुळे तसेच उपरोक्त कारणांमुळे विभागास १५ फेब्रुवारी नंतर यंत्रसामुग्री खरेदीच्या प्रस्तावांना मान्यता देणे शक्य झाले नाही.

राज्यातील खाजगी, शिक्षण संस्थेत व्यवसायीक अभ्यासक्रमाचे ई.बी.सी. शिष्यवृत्तीचे वाटप करण्याबाबत

(५८) * ९३२३ श्री.सतिश चव्हाण, श्री.अनिल तटकरे, डॉ.सुधीर तांबे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.विक्रम काळे : तारांकित प्रश्न क्रमांक ३९४९ ला दिनांक २६ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील खाजगी, शिक्षण संस्थेत व्यवसायीक अभ्यासक्रमाचे शिक्षण घेणाऱ्या मागासवर्गीय विदयार्थ्यांची सन २०१४-२०१५ या वर्षाची ई.बी.सी. शिष्यवृत्तीचे अद्याप वाटप केले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ई.बी.सी. वाटप न झाल्याने शैक्षणिक संस्था विदयार्थ्यांकडे फी वसुलीसाठी तगादा लावत असुन मराठावाडयातील दुष्काळी परिस्थितीमुळे विदयार्थी मानसिक तणावाखाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०१४-१५ या वर्षाची ई.बी.सी. शिष्यवृत्तीचे त्वरीत वाटप करणेसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) खाजगी विनाअनुदानित संस्थेमध्ये व्यवसायिक अभ्यासक्रमाकरीता प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना सन २०१४-२०१५ मध्ये देय असलेल्या शिष्यवृत्तीच्या रकमे पैकी उपलब्ध झालेली रुपये ३३.१७ कोटी इतकी रक्कम वितरित करण्यात आली आहे.

(२) काही संस्थाचालक थकीत शिष्यवृत्तीची मागणी करीत आहेत, हे खरे आहे.

(३) व (४) सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षात उपलब्ध असलेली रुपये २२०.०० कोटी तरतूद आंहरित करण्याचा प्रस्ताव सहमतीसाठी वित्त विभागाकडे पाठविण्यात आला आहे.

राज्यातील नळ पाणीपुरवठा योजना बंद असल्याबाबत

(५९) * ९६२७ श्री.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.आनंद ठाकूर, श्री.ख्वाजा बेग : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ३ हजार ७६४ नळपाणीपुरवठा योजना बंद असल्याची बाब माहे मे २०१५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याची पाहणी वा चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील सुमारे १ कोटी ६१ लाख जनतेला भेडसावणारा पाणीप्रश्न सोडविण्यासाठी शासन कोणता उपक्रम राबविणार आहे वा राबविण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर : (१) हे खरे नाही.

राज्यातील ग्रामीण भागात २४९६ नळ पाणीपुरवठा योजना विविध कारणांमुळे बंद आहेत.

(२) व (३) होय.

राज्यात ग्रामीण पाणीपुरवठा उपाययोजनांसाठी केंद्र शासन पुरस्कृत राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम राबविण्यात येत आहे. सदर कार्यक्रमाच्या निकषानुसार पिण्याच्या पाण्यासाठी दरडोई ४० लिटर प्रतिदिन पाणीपुरवठा होणे आवश्यक आहे. त्यानुसार या निकषापेक्षा कमी प्रमाणात पाणीपुरवठा होत असलेल्या गावे/वाड्यांना राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाद्वारे पेयजल सुविधा पुरविण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

कल्याण पश्चिम (जि.ठाणे) उंबर्डे येथील औद्योगिक प्रशिक्षण केंद्र सुरु करण्याबाबत

(६०) * १०३०४ श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण पश्चिम (जि.ठाणे) उंबर्डे येथील दोन एकर भूखंडावर सुमारे साडे तीन कोटी रुपये खर्चून औद्योगिक प्रशिक्षण संस्थेची इमारत बांधून धुळखात पडली असल्याने विद्यार्थ्यांना या औद्योगिक प्रशिक्षण केंद्राचा फायदा होत नसल्याचे माहे जून, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने त्वरीत हे प्रशिक्षण केंद्र सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, उक्त प्रश्नाबाबत कोणतीच कार्यवाही होत नसल्यास विलंबाची कारणे कामे आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) हे खरे नाही.

मौजे उंबर्डे, कल्याण पश्चिम (जि.ठाणे) संस्थेच्या इमारतीच्या बांधकामास दिनांक २७.०६.२००८ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून, बांधकामास नोव्हेंबर २०१३ पासून सुरूवात झाली आहे. तथापि, संस्थेच्या प्रशासकीय इमारत व कार्यशाळेचे विद्युतीकरण, संरक्षण भिंत, जमीन सपाटीकरण, अंतर्गत रस्ते, पथ दिवे आणि पाण्याचे कनेक्शन अपूर्ण असल्याने संस्थेस इमारतीचा ताबा मिळाला नसल्याने, सध्या 'शासकीय तांत्रिक विद्यालय, उल्हासनगर-०३' येथे संस्था कार्यरत आहे.

(२) सार्वजनिक बांधकाम विभागाकडे संस्थेची अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी पाठपुरावा सुरू असून, सदर विभागाकडून कामे पूर्ण झाल्यानंतर संस्थेचे स्थलांतरण मौजे उंबर्डे, कल्याण पश्चिम (जि.ठाणे) येथे करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील चेंबूरनाका येथील एमटीएस या शाळेत दुपारच्या वेळेत विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या खिचडीमध्ये उंदरांची मेलेली पिल्ले सापडल्याबाबत

(६१) * ८८१९ श्री.जर्नादन चांदूरकर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील चेंबूरनाका येथील एमटीएस या शाळेत दुपारच्या वेळेत विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या खिचडीमध्ये उंदरांची मेलेली पिल्ले सापडली असल्याचे दिनांक २१ मार्च, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या शाळेला पोषण आहार पुरविणा-या बचतगटावर शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्याचे कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१), (२) व (३) दिनांक १९/०३/२०१५ रोजी चेंबूरनाका मुंबई पब्लिक स्कूल या मुंबई महानगरपालिकेच्या शाळेतील शालेय पोषण आहारामध्ये उंदराची दोन लहान पिल्ले मृतावस्थेत आढळून आली होती. सदर आहार विद्यार्थ्यांना वितरीत करण्यात आलेला नाही. सदर शाळेला आहार पुरविणाऱ्या महिला बचत गटाचे काम बंद करण्यात आले असून बचत गटास रु. ५०००/- इतका दंड आकारण्यात आला आहे.

लोहा (जि.नांदेड) तालुक्यातील विनाअनुदानित शाळेतील विद्यार्थ्यांना मोफत पाठयपुस्तके, गणवेश तसेच उपस्थिती भत्ता देण्याबाबत

(६२) * ८९६४ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.सुभाष झांबड : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोहा (जि.नांदेड) तालुक्यातील पहिली ते आठवीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना सर्व शिक्षा अभियानांतर्गत मोफत शिक्षण देण्याची योजना असली तरी विनाअनुदानित शाळेतील विद्यार्थ्यांना मात्र शासनाकडून अद्यापही पुस्तके देण्यात आली नसल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाच्यावतीने वर्ग पहिली ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना सर्व शिक्षा अभियानांतर्गत मोफत पाठ्यपुस्तके, गणवेश तसेच उपस्थिती भत्ता देखील दिला जात असून सदरहू योजना विनाअनुदानित शाळेतील विद्यार्थ्यांना मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनुदानित व विनाअनुदानित असा भेदभाव चालू असल्याने त्याचा फटका विद्यार्थ्यांना बसत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कायर्वाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१), (२), (३) व (४) सर्व शिक्षा अभियानांतर्गत मोफत गणवेश वाटप व मोफत पाठयपुस्तक वाटप या योजना राबविण्यात येतात. सर्व शिक्षा अभियान ही केंद्र पुरस्कृत योजना असून केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनूसार राबविण्यात येतात. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार विनाअनुदानित शाळांना सदर योजना लागू नाहीत.

राज्यातील इ. १ ली ते ४ थी मध्ये शिकणाऱ्या मुलींच्या गळतीचे प्रमाण कमी करण्यासाठी व शाळेतील उपस्थितीचे प्रमाण वाढविण्यासाठी राज्य शासनाने उपस्थिती भत्ता वाटप योजना सुरु केलेली आहे. सदर योजना खाजगी शाळांना लागू नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

भाषा विषयाचे पेपर पॅटर्न रचनावादी करण्यासंदर्भात शिक्षण विभागाच्या शासन निर्णयाबाबत

(६३) * ९०५४ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात रचनावादी शिक्षणाचा दृष्टीकोन समोर ठेवत भाषा विषयाचे पेपर बदलण्यासंदर्भात शिक्षण विभागाकडून प्रयत्न सुरू असून त्याअंतर्गत इयत्ता ९ वीपासून ते १२ वी पर्यंत भाषा विषयाचा पेपर पॅटर्न बदलत ते अधिक रचनावादी (ॲक्टिव्हिटी बेस) करण्याचा विचार शासन करीत असल्याचे दिनांक १८ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली आहे,
(३) अद्याप, याबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) अंशतः खरे आहे.
(२) इयत्ता ९ वी साठी शैक्षणिक वर्ष २०१५-२०१६ पासून सुधारित मुल्यमापन पद्धत कृतिपत्रिकांचे आराखडे प्रथम भाषा विषय - मराठी, हिंदी, गुजराथी, उर्दु, कन्नड, तेलुगु, सिंधी तसेच व्दितीय/तृतीय भाषा विषय संस्कृत याचे निवेदन मंडळाशी संलग्न सर्व शाळांना वितरित करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

नाशिक जिल्ह्यातील नांदगाव शहराला माणिकपुंज धरणातून पाणीपुरवठा करणेबाबत

(६४) * ९४२० श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल भोसले : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील नांदगाव शहराला माणिकपुंज धरणातून पाणीपुरवठा योजना तयार करण्याची नाशिक जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी माहे मे, २०१२ मध्ये वा त्या दरम्यान पासून शासनाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीबाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर : (१) होय, हे खरे आहे.

(२) सन २०१२-२०१३ च्या टंचाई कालावधीसाठी प्रस्तुत तातडीच्या पाणीपुरवठा योजनेस शासनाने मान्यता दिली होती. सदर तातडीची पूरक पाणीपुरवठा योजना पूर्ण करुन कार्यान्वित केलेली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

वैभववाडी (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यामध्ये शेतकऱ्यांकडून खरेदी करण्यात आलेल्या भात गोदामामध्ये खराब झाल्याबाबत

(६५) * ९९७३ प्रा.जोगेन्द्र कवाडे : सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैभववाडी (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यामध्ये खरेदी-विक्री संघामार्फत शेतक-यांकडून खरेदी करण्यात आलेला ५०३ क्विंटल भात गोदामामध्ये खराब होऊन उंदीर व घुशींनी खाल्ल्यामुळे लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचे माहे मे, २०१५ च्या शेवटच्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) उक्त जिल्ह्यातील तळेवाड, मालवण व देवगडमध्ये असलेला तांदूळ भरपूर प्रमाणात असल्याने नव्याने भात खरेदी होणार नसल्याचे शासनाने कळविले असल्याने शेतक-यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने उक्त प्रकरणी पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश बापट : (१) हे खरे नाही.

वैभववाडी (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यामध्ये खरेदी-विक्री संघामार्फत खरेदी केलेला धान ५०३ क्विंटल नसून ३९३.८८ क्विंटल धान गोदामात शिल्लक आहे.

(२) हे खरे नाही.

देवगड तालुक्यात दि.१३.६.२०१५ अखरे ६८१.४५ क्विंटल धान खरेदी झालेली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील विद्यापीठ व महाविद्यालयीन न्यायाधिकरण गेले एक वर्षभर कार्यरत नसल्याबाबत

(६६) * १०४६६ श्री.हरिसिंग राठोड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील विद्यापीठ व महाविद्यालयीन न्यायाधिकरण गेले एक वर्षभर कार्यरत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, विद्यापीठ व महाविद्यालयीन न्यायाधिकरण कार्यरत नसल्यामुळे विद्यापीठातून १०० हून अधिक प्राध्यापक, प्राचार्य व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना न्याय मिळण्यास विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) अद्यापपर्यंत कार्यवाही करण्यात आली नसल्यास, त्यामागील सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) होय.

(२) सदर न्यायाधिकरणावरील पीठासीन अधिकाऱ्यांचे पद रिक्त होते.

(३) होय.

(४) शासनाच्या दि. ११ जून, २०१५ च्या निर्णयान्वये विद्यापीठ व महाविद्यालये न्यायाधिकरण, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे या न्यायाधिकरणावर पीठासीन अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

मानेवाडी (जि.बीड) तालुक्यात पेयजल ग्रामीण पाणीपुरवठा योजनेस मंजूरी मिळाल्याबाबत

(६७) * १०८४१ श्री.विनायकराव मेटे : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मानेवाडी (जि.बीड) तालुक्यात पेयजल ग्रामीण पाणीपुरवठा योजनेअंतर्गत सन २०११-१२ मध्ये मंजूरी मिळाली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सरपंच व ग्रामसेवक यांनी खोटी पाणीपुरवठा समिती नेमून, खोटी ग्रामसभा दाखवून, ग्रुप ग्रामपंचायत असताना केवळ दोन ग्रामपंचायत सदस्य यांच्या संगनमताने योजना तयार करुन घेतली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, मानेवाडी गावापासून वाढवणा पाझर तलावात कायमस्वरुपी पाणी असताना व तसेच १ कि.मी. असतानाही अंदाजपत्रक वाढविण्याकरिता रुईगव्हाण येथून पाझर तलावात पाणी नसतानाही ५ कि.मी. अंतरावरुन ही योजना प्रस्तावित केली , हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या योजनेमध्ये शासनाची फसवणूक झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी करुन कारवाई करण्यात आली आहे काय,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर : (१) होय. हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे नाही.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील शाळांनी विकास आराखडा तयार करून पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत

(६८) * ७५९३ डॉ.सुधीर तांबे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.राहुल नार्वेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.अनंत गाडगीळ, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.राजेंद्र मुळक, श्री.माणिकराव ठाकरे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.शरद रणपिसे, श्री.विजय गिरकर, श्री.प्रकाश बिनसाळे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.प्रकाश गजभिये, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती दिप्ती चवधरी : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शिक्षणाची दशा आणि दिशा बदलण्यासाठी सरकार वर्षाला कोटयवधी रुपये खर्च करित असले तरीही राज्यातील शिक्षण व्यवस्था पायाभूत सुविधा उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील १२ हजार शाळांमधील अजूनही वीज नाही मात्र यातील १ हजार ८०० शाळांमध्ये वीज नसतानाही संगणकाची हायटेक व्यवस्था मात्र करण्यात आलेली आहे, ३५ हजार शाळांमध्ये प्रसाधनगृहांची सोय असली तरीही पाणी नाही, त्यातही ७५० शाळांमध्ये मुलींसाठी प्रसाधनगृहे नाहीत इत्यादी बाब कॅगच्या अहवालातून नुकतीच निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(३) तसेच शासनाचा कोट्यवधीचा निधी अखर्चित राहत आहे, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, प्रत्येक शाळेने त्यांचा विकास आराखडा तयार करणे बंधनकारक असतानाही राज्यातील ८८ हजार २९४ शासकीय अनुदानित शाळापैकी १४.६४ टक्के म्हणजेच १२ हजार ९७० शाळांनी त्यांचे विकास आराखडेच बनविलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आली आहे काय,

(६) असल्यास, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

श्री. विनोद तावडे : (१) अंशतः खरे आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये मुलभूत सुविधांपैकी काही सुविधा उपलब्ध नाहीत.

(२) अंशतः खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) अंशतः खरे आहे.

शासकीय व अनुदानित एकूण ८९,०९१ शाळांपैकी ७९,६०९ म्हणजेच ८९.३५ टक्के शाळांनी विकास आराखडा बनवला आहे.

(५) शाळा विकास आराखडा तयार केलेला नाही अशा शाळांची चौकशी करण्यात येत आहे.

(६) चौकशी अहवाल प्राप्त झालेला नाही.

राज्यातील शासनमान्य अनुदानित संस्थांमधील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मिळण्याबाबत

(६९) * ८०६६ श्री.रामनाथ मोते, श्री.नागो गाणार, डॉ.अपूर्व हिरे, श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, श्री.दत्तात्रय सावंत : तारांकित प्रश्न क्रमांक ३७६२ ला दिनांक २६ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात: सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे अनुदानित संस्थांमधील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू व्हावी म्हणून महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे कार्याध्यक्ष यांना आतापर्यंत किती निवेदने दिली आहेत,
(२) मा.मुंबई उच्च न्यायालयाने याचिका क्र.८९८५/२०१३ मध्ये दिनांक १९ ऑगस्ट, २०१४ रोजी काय निर्देश दिले आहेत,
(३) न्यायालयात मान्य करुनही व शिक्षण संचालकांच्या दिनांक २३ मार्च, २०१५ रोजी याबाबतचा प्रस्ताव प्राप्त होऊनही सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना अद्यापही लागू न करण्याची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे कार्याध्यक्ष यांनी याबाबत वारंवार निवेदने दिली आहेत.
(२) व (३) मा.मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार याबाबत शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे.

ऊर्जा क्युअर या कंपनीने सोलर पंप बसविण्याच्या कामात केलेला गैरव्यवहार

(७०) * **९७७७ श्रीमती शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पूर्व विदर्भातील चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया जिल्हा परिषद माध्यमातून ग्रामपंचायत स्तरावर सन २०१३-२०१४ या वर्षात सोलर दुहेरी पंप योजना राबविण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गडचिरोली ६५, गोंदिया ३०, चंद्रपूर ६० सोलर पंप बसविण्याचा कंत्राट ऊर्जा क्युअर या कंपनीला देण्यात येवून प्रत्येकी पंपाची किंमत ५ लक्ष रुपये प्रमाणे करार होवूनही सदर कंत्राटदाराने गडचिरोली, अहेरी, एटापल्ली, भामरागड, कोरची, कुरखेडा या तालुक्यातील ग्रामपंचायत भागात एकही सोलर पंप न बसविता लाखो रुपये घेतले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करुन कंत्राटदारावर कारवाई करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी माननीय ग्रामविकास मंत्री यांना माहे मार्च, २०१५ ला व दिनांक १ जून, २०१५ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्र दिले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी करुन कंत्राटदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर : (१) होय.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील इंजिनिअरिंग आणि फॉर्मसी कॉलेजना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेकडून नोटीस पाठविल्याबाबत

(७१) * ७७४४ श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल भोसले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.सतिश चव्हाण, श्री.रामराव वडकुते, श्री.प्रकाश बिनसाळे : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह राज्यातील तब्बल २९ मॅनेजमेंट, इंजिनिअरिंग आणि फॉर्मसी कॉलेजना ऑल इंडिया कौन्सिल फॉर टेक्निकल एज्युकेशनने (एआयसीटई) लेटर ऑफ रिजेक्शनची नोटीस पाठविल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान शेवटच्या सप्ताहात उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

श्री. विनोद तावडे : (१) अंशत: खरे आहे.

(२) होय.

(३) अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मानकानुसार सदर महाविद्यालयांमध्ये त्रुटी असल्याने अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेकडून तंत्र शिक्षण संचालनालयाअंतर्गत १० अभियांत्रिकी व पदव्युत्तर आणि २ पदविका संस्थांना मुदतवाढ देण्यात आली नाही. तसेच ०३ अभियांत्रिकी यांना प्रवेश क्षमतेत घट करुन मुदतवाढ देण्यात आली आहे.

सदर संस्थांना अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने शैक्षणिक वर्ष २०१५-१६ साठी मुदतवाढ न दिल्यामुळे त्यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका दाखल केल्या आहेत. मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये सदर संस्थांना प्रवेश प्रक्रियेमध्ये समाविष्ट करण्यात आले आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथे झालेल्या बारकोड उत्तरपत्रिका छपाई गैरव्यवहाराबाबत

(७२) * १०२४५ श्री.अमरसिंह पंडित, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.सतिश चव्हाण, श्री.धनंजय मुंडे : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथे अभियांत्रिकी व विधी विभागाच्या ३२ पानी ६ लाख उत्तरपत्रिका शिल्लक असतानाही नविन बारकोड उत्तरपत्रिका छपाई करण्याचा निर्णय घेण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यापीठ कायदा आणि लेखासंहिता यांचे उल्लंघन करुन गुजरातमधील कंत्राटदाराशी संगनमत करुन उक्त उत्तरपत्रिका छपाई करण्यात आली असल्यामुळे या गैरव्यवहारातील दोषींविरुध्द कारवाई करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक १५ जून, २०१५ रोजी वा त्यासुमारास केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी दिनांक ३० मार्च, २०१५ रोजी चौकशी समिती नेमण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, चौकशी समितीने केलेल्या चौकशीचे निष्कर्ष काय आहे तसेच, चौकशी अहवाला आधारे दोषीविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) नाही.

(२) होय.

(३), (४) व (५) सदर प्रकरणी डॉ. सर्जेराव ठोंबरे अधिसभा सदस्य यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठीत करण्यात आली असून चौकशी समितीचे कामकाज अद्याप सुरु आहे.

के.जे.सोमय्या तंत्रनिकेतन, विद्याविहार मधील आणि अन्य संस्थेतील बाष्प परिचर यांची पदे रद्द करण्यात आल्याबाबत

(७३) * **७६८१ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) के.जे.सोमय्या तंत्रनिकेतन, विद्याविहार मधील श्री. उमाजी ना.हरनोळ आणि अन्य संस्थेतील बाष्प परिचर यांची पदे रद्द करण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रद्द करण्यात आलेल्या बाष्प परिचर कर्मचा-यांना समकक्ष पदावर सामावून घेण्यात आले आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे व त्या अनुषंगाने काय उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

श्री. विनोद तावडे : (१) होय.

शासनाच्या दिनांक १४ जानेवारी, २००३ च्या शासन निर्णयानुसार शासकीय व अशासकीय अनुदानित शैक्षणिक संस्थेतील पदांच्या आढाव्याअंती अनावश्यक ठरलेली पदे व्यपगत करण्यात आली आहेत. त्या पदांमध्ये सदर संस्थेतील बाष्पक परिचर या पदाचा समावेश आहे.

(२) नाही.

बाष्पक परिचर हे पद के.जे. सोमय्या तंत्रनिकेतन विद्याविहार या संस्थेत मंजूर होते. श्री.उमाजी हरनोळ यांनी धारण केलेली शैक्षणिक अर्हता ही संस्थेतील रिक्त असलेल्या इतर पदासाठी आवश्यक असलेल्या अर्हतेपेक्षा भिन्न असल्याने तसेच वेतनश्रेणीतील भिन्नतेमुळे त्यांचे समायोजन करण्यात आलेले नाही. श्री.हरनोळ सदर संस्थेतून दिनांक ३१/०३/२०११ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेले आहेत.

(३) शासनाच्या सुधारित पदांच्या आढाव्यानुसार अतिरिक्त ठरविण्यात आलेल्या पदांना ६ व्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

जमिनीतील पाण्याची खालावलेली पातळी लक्षात घेऊन
बोअरवेल घेणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करणेबाबत

(७४) * **६७१९ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जमिनीतील पाण्याची खालावलेली पातळी लक्षात घेऊन शासनाने २०० फुटांपेक्षा जास्त खोल बोअरवेल खोदणाऱ्यांना दंडात्मक शिक्षा देण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयानुसार प्रत्यक्ष कारवाई सुरु करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, या निर्णयानुसार नियंत्रण ठेवण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना तयार केली आहे ?

श्री. बबनराव लोणीकर : (१) नाही. या संदर्भात निर्बंध घालण्याबाबत महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणामार्फत कार्यवाही सुरु आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

दहीसर नदीचे पाणी प्रदुषणयुक्त झाल्याबाबत

(७५) * ८८२२ **श्री.जर्नादन चांदूरकर, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घरादारातील कचरा, प्लास्टीकच्या पिशव्या, तबेल्यातील शेण व केमिकलयुक्त सांडपाण्याने दहीसर नदीचे पाणी प्रदुषणयुक्त झाल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, या नदीला प्रदुषणमुक्त करण्यासंदर्भात शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रामदास कदम : (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, दहिसर नदी व परिसराची पाहणी २९ व ३० जून, २०१५ रोजी म.प्र.नि. मंडळातर्फे करण्यात आली आहे.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेस कारवाई करण्याबाबत कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

नांदेड जिल्ह्यातील स्वजल धारा योजनेबाबत

(७६) * ८९६५ **श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यातील स्वजल धारा योजनेत एकतीस लाख रुपयांचा गैरव्यवहार करण्यात आला असुन या योजनेतील ३१ लाख १९ हजार ५६० रुपयांच्या योजनेतून गावाला पाणी तर दिलेच नाही उलट पाणी कर वसुल करण्यात येत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी संबंधित दोषींवर शासनाने कारवाई कोणती केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर : (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील महाविद्यालय व विद्यापीठांबाबत डॉ.राम ताकवले व त्यागराजन समित्यांनी शासनास सादर केलेल्या अहवालांबाबत

(७७) * ९३५९ श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल भोसले : तारांकित प्रश्न क्रमांक ३४८७ ला दिनांक १२ मार्च,२०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात: सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महाविद्यालय व विद्यापीठांबाबत डॉ.राम ताकवले व त्यागराजन या समित्यांनी शासनास सादर केलेले अहवाल दि. ९ मे २०१२ पासून शासनाकडे निर्णयासाठी प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डॉ.राम ताकवले समितीने मुंबई, पुणे व नागपूर विद्यापीठांचे विभाजन करुन स्वतंत्र विद्यापीठे स्थापन करण्याबाबत तर त्यागराजन समितीने प्रत्येक विद्यापीठात किमान १०० महाविद्यालयांचा समावेश असावा याबाबत आपल्या अहवालांमध्ये शासनास शिफारशी केलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) नुसार महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियमांच्या तरतुदींना अंतीम स्वरुप देवून ३५ नवीन उपविद्यापीठांची निर्मिती करण्यासंदर्भात शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

श्री. विनोद तावडे : (१) अंशतः खरे आहे.

डॉ.राम ताकवले समितीचा अहवाल प्रलंबित आहे. त्यागराजन समिती विद्यापीठ अनुदान आयोगाने गठीत केली आहे. त्याचा अहवाल शासनाकडे प्रलंबित नाही.

(२) डॉ.राम ताकवले समितीने मोठ्या विद्यापीठांचे विभाजन करण्याची शिफारस केली आहे.

(३) अहवाल विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

सापे (ता.महाड, जि.रायगड) येथे पाणी पुरवठा योजनेची नविन पाईप लाईन टाकण्याबाबत

(७८) * ९९७६ प्रा.जोगेन्द्र कवाडे : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सापे (ता.महाड, जि.रायगड) येथे पाणी पुरवण्यासाठी २० वर्षापूर्वी टाकण्यात आलेली पाईप लाईन जीर्ण झाली असून त्याद्वारे दुषित पाण्याचा पुरवठा होत असल्याने तेथील ग्रामस्थांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाल्याचे माहे मे, २०१५ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गावाला नवीन पाईप लाईन मिळण्याकरीता ग्रामीण पेयजल योजनेच्या माध्यमातून तसा प्रस्ताव माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान संबंधित ग्रामस्थांनी शासनाकडे पाठविला असतांनाही अद्यापपर्यंत उक्त प्रस्तावावर कोणतीही कार्यवाही न करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रस्तावावर त्वरीत कार्यवाही करुन सदर गावास ग्रामीण पेयजल योजनेच्या माध्यमातून नविन पाईप लाईन टाकण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, उक्त काम केव्हापर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर : (१) हे खरे नाही.

(२) व (३) जुन्या योजनेतून पाणी पुरवठा कमी होत असल्याने सापे, ता.महाड, जि.रायगड येथे राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेच्या माध्यमातून नवीन पाणी पुरवठा योजना होणेबाबतचा प्रस्ताव दिनांक १७/०७/२०१४ रोजी जिल्हा परिषद, रायगड कडे प्राप्त झाला असून सदर कामाच्या अंदाजपत्रकास रक्कम रुपये ५४,९४,६९५/- इतक्या किंमतीस तांत्रिक मान्यता कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग यांनी नोव्हेंबर, २०१४ मध्ये दिलेली आहे. सापे, ता.महाड, जि.रायगड या गावाचा समावेश सन २०१५-१६ च्या कृती आराखडयात समाविष्ट आहे. तथापि, सन २०१५-१६ या कृती आराखडा अद्यापही अंतिम झाला नसल्यामुळे सदर योजनेच्या पुढील मंजूरीची कार्यवाही करता येत नाही.

(४) सापे, ता.महाड, जि.रायगड पाणीपुरवठा योजनेच्या प्रस्तावास मान्यता मिळाल्यानंतर एक वर्ष कालावधीत काम पूर्ण होणे अपेक्षित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन :
मुंबई.

उत्तमसिंग चव्हाण
सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.